दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य — संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | सोमवार,दि.५ मे २०२५ | वर्ष४थे | अंक२६२वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# आंबा खाताय,सावधान!

आंबा पिकवण्यासाठी घातक रसायनांचा **सर्रास वापर!**

नागरिकांचे आरोग्य आले **धोक्यात**

अन्न व औषध प्रशासनाचे **दुर्लक्ष होत**

गोडाऊनमध्ये एक वेळेस अवश्य भेट **द्यायला हवी**

## अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष

सुशिल टकले/गेवराई

गेवराई:तालुक्यात सध्या बाजारात मोठ्या प्रमाणात आंब्यांची विक्री होते आहे. पण याच पिवळ्या धम्मक आंब्यांमध्ये काही घातक रसायनांचा सर्रास वापर होत असल्याचे आंब्याच्या रंगावरून दिसून येते. हे रसायन शरीरासाठी हानिकारक आहे. यामुळे गेवराई तालुक्यातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याकडे अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे अशी चर्चा चौकात-चौकात, लग्न सोहळ्यामध्ये होत आहे. गेवराई तालुक्यात मोठ्या प्रमाणावर फळे रसायाचा वापर करून पिकवली जात आहेत. कच्च्या आंब्याचा रंग बदलण्यासाठी, आंबा लवकर पिकावा यासाठी विविध प्रकारची रसायने वापरली जात आहेत. अशा रसायनामुळे एका रात्रीतून आंबे पिकत असल्याची चर्चा होत आहे.



गावरान आंबा वगळता सध्या बाजारात घातक रसायनाचा वापर केलेले आंबे हातगाडीवर पहायला मिळत आहे. त्यांचा रंगही पिवळा धम्मक आहे. तसेच कृत्रिमरित्या पिकवलेले हे आंबे त्वरीत न वापरल्यास ते खराब होत आहेत. अशाच अंब्यांचा रस ग्राहकांना दिला जात आहे. तसेच रसासनांचा वापर करून आंबे पिकलेले असल्याने त्याचा शरीरावरही घातक परिणाम होण्याची दाट शक्यता आहे.

सध्या लग्न सराई सुरू असून अनेक ठिकाणी आंब्याच्या रसाचा बेत दिसत आहे. मात्र, रसासाठी वापरले जाणारे आंबे कृत्रिमरित्या पिकवलेले आहेत का? असा प्रश्न निर्माण होत आहे. तसेच रस्त्याच्या कडेलाही मोठ्या प्रमाणात असलेल्या ज्यूस बार मधून वाढत्या उन्हापासून बचाव करण्यासाठी आंब्याच्या रसाला पसंती दिली जात आहे. मात्र, हे रस पिताना नागरिकांनीही सावधान असावे. पान २ वर

गेवराई तालुक्यात व इतर काही भागात रस्त्याच्या कडेला सध्या मोठ्या प्रमाणावर जूस बार पहायला मिळत आहेत. तसेच आंबा विक्रीची दुकानेही आहेत. बहुतांश दुकानांमधून असे आंबे विक्रीसाठी आहेत. गेवराई तालुक्यात केसर, हापूस ,दसहरी आंबे दिसून येतात. १०० रुपयांपासून तर ३०० रुपये किलो पर्यंत या आंब्याचे भाव असून, आंबा घेताना पारखून घेण्याची गरज आहे. कार्बाइडचा वापर केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांना कारवाई करणार कोण, त्यासाठी सक्षम यंत्रणा आहे का? असाही प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच अन्न व औषध प्रशासन यावर कारवाई करणार का? असा प्रश्न निर्माण होत आहे.

बाजारात सध्या पिवळ्या रंगांचे आंबे विक्रीसाठी दिसत आहेत. हे आंबे नैसर्गिक रित्या पिकवलेले दिसत नाहीत. त्यामुळे नागरिकांनी आंबे खरेदी करताना विशेष सावध राहिले पाहिजे. तसेच आंबा व्यापाऱ्यांनी रसायनांचा वापर टाळला पाहिजे. नैसर्गिक पद्धतीने आंबे पिकवूनच बाजारात त्याची विक्री करावी. त्यातून नागरिकांचे आरोग्य चांगले राहिलच. शिवाय कारवाईला सामोरे जावे लागणार नाही.

– पंकज पाटेकर
संस्थापक अध्यक्ष, चंपावती प्रतिष्ठान

# महापालिका निवडणुकांचे बिगुल?

**रणधुमाळी:**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीवर सुनावणी



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई: महापालिकेने निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. ६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणी दिवशीच निवडणुकांच्या तयारीसाठी अधिका-यांना रुजू होण्याचे आदेश दिल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. सरकारी कार्यालयातील कर्मचा-यांना केंद्रस्तरीय अधिकारी पदावर रुजू होण्याचेही आदेश दिले आहेत. अन्यथा कारवाई होऊ शकते असे सांगण्यात आले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्याने राज्यातील मुंबई, पुणे, पिंपरी चिंचवडसह तब्बल २३ महापालिकांवर प्रशासकीय पान २ वर

### अशी आहे आकडेवारी

एकूण महापालिका:२९
मुदत संपलेल्या महापालिका: २९
एकूण नगरपरिषदा:२४३मुदत संपलेल्या नगरपरिषदा:२२८
एकूण नगरपंचायती:१४२
मुदत संपलेल्या नगरपंचायती: २९
एकूण जिल्हा परिषदा: ३४
मुदत संपलेल्या जिल्हा परिषदा:२६
एकूण पंचायत समिती:३५१
मुदत संपलेल्या पंचायत समिती:२८९

# बापानेच काढला मुलाचा काटा

**खानापूरमध्ये खून:**दारुच्या नशेत टोकाचे पाऊल

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:शहराजवळील खानापूर येथे बापाने लेकाच्या डोक्यात लाकडी बांबुचा पाय घालून खून केल्याची घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. रोहीत गोपाळ कांबळे असे मयत तरूणाचे नाव असून गोपाळ विठ्ठल कांबळे असे आरोपी बापाचे नाव आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार मयत मुलगा आणि आरोपी असलेला बाप या दोघांनाही दारूचे व्यसन होते. दारू आणण्याच्या कारणावरून या दोघांमध्ये नेहमीच कुरबुरी व्हायच्या. आठ



दिवसांपुर्वीच रोहीत कांबळे याने गळफास घेऊन आत्महत्येचा देखील प्रयत्न केला होता. आज सकाळी दोघेही दारूच्या नशेत असतानाच पुन्हा त्यांच्यात कुरबूर झाली. यावेळी बापाने जवळच पडलेला लाकडी बांबू डोक्यात पान २ वर

# आज बारावीचा निकाल घोषित

**शैक्षणिक:**बोर्डाने तारीख केली जाहीर

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:राज्यातील बारावीचा निकाल उद्या म्हणजे ५ मे २०२५ रोजी जाहीर होणार आहे. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ५ मे रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार आहे. याबाबत राज्य शिक्षण मंडळाने माहिती दिली आहे. तर मंगळवारपासून (६ मे) महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना गुणपत्रिका दिली जाणार आहे.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र निकालासाठी अधिसूचना जारी केली आहे. अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र बोर्ड बारावीचा निकाल उद्या दुपारी जाहीर केला जाईल. बोर्डाच्या वतीने घेण्यात येणा-या पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला जाणार आहे. त्यानंतर, विद्यार्थी अधिकृत वेबसाईट mahresult. पळल.ळप वर जाऊन गुणपत्रिकेची प्रत डाऊनलोड करून निकाल पाहू शकतील. दरम्यान, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रुवारी-मार्च २०२५ दरम्यान दहावी आणि बारावीची परीक्षा घेण्यात आली. पान २ वर

# महाराष्ट्रावर अवकाळी पावसाचे संकट

**अंदाज:**विदर्भाच्या अनेक जिल्ह्यांत वादळी पावसाची शक्यता

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:गेल्या काही दिवसांपासून वातावरणात कमालीचा बदल जाणवत आहे. कधी उन्हाचा तीव्र कडाका तर कधी अवकाळी पाऊस अशीच स्थिती निर्माण होताना दिसत आहे. राज्यातील बहुतांश शहरांच्या कमाल तापमानात वाढ झाली आहे. त्यामुळे उन्हाचे चटके बसत असतानाच आता पुढील सात दिवस राज्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, अमरावती, संपूर्ण कोकण, खान्देश, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, धाराशिव, पान २ वर



### तापमानात दोन अंशांनी येणार घट

महाराष्ट्रात कमाल तापमान ३८ अंशांपर्यंत असून, काही ठिकाणी तर ४० अंश सेल्सिअसपर्यंत आहे. शनिवारपासूनच्या आठवड्यात तापमान दोन अंश सेल्सिअसने खालावण्याची शक्यता आहे. सध्या महाराष्ट्रात रात्रीचा उकाडा वा कुठेही उष्णतेच्या लाटेची शक्यता नाही. ईशान्य राजस्थानात समुद्र सपाटीपासून १.५ ते ३.१ किलोमीटर उंचीवर चक्राकार वा-याची स्थिती आहे.

# बाजीराव चव्हाणांच्या मदत कक्ष कार्यालयास दिली भेट

**ऋणानुबंध:**राहुल केंद्रेंनी जाणून घेतले कामकाज



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:बाजीराव दादा चव्हाण जनसंपर्क कार्यालय,शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व धर्मवीर प्रतीष्ठाण कार्यालय बीड येथे भारतीय जनता पार्टीचे नेते व लातूर जिल्हापरिषद चे माजी अध्यक्ष राहुलजी केंद्रे साहेब यांनी सदिच्छा भेट दिली यावेळी बाजीराव दादा यांच्या वतीने हृदय पूर्वक सत्कार करण्यात आला.यावेळी त्यांनी बाजीराव दादा चव्हाण यांच्या बीड येथील रुग्ण सेवेची व ईतर सामाजिक उपक्रमांची माहिती घेतली असता.बाजीराव दादा चव्हाण यांच्या विषयी मराठवाड्यामध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या पान २ वर

**चर्चेतले**

## ७ मे रोजी होणार सुनावणी

# शिवसेना पक्ष ठाकरेंचा का शिंदेंचा?

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:शिवसेनेतील फुटीनंतर निवडणूक आयोगाने शिवसेना आणि धनुष्यबाण हे एकनाथ शिंदे यांना दिले होते. या निर्णयाच्या विरोधात उद्धव ठाकरे हे सुप्रीम कोर्टात गेले होते. या प्रकरणी फेब्रुवारी २०२३ मध्ये त्यांनी याचिका दाखल केली होती. आता या प्रकरणी कोर्टात बुधवारी (७ मे) सुनावणी होणार आहे. त्यामुळे शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह कोणाचे यावर फैसला होणार आहे.

शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर एकनाथ शिंदे भाजपच्या पाठिंब्याने मुख्यमंत्री झाले. त्यावेळी एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांना निवडणूक आयोगाने पान २ वर



**निवडणुकीत फैसला झालाब :** चिन्ह आणि पक्षाबाबत कोर्टात सुनावणी होत असली तरी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका कार्यक्रमात बोलताना म्हटले की, खरी शिवसेना कोणाची याचा फैसला निवडणुकीत झाला आहे. घरून काम करणा-यांना जनतेने घरीच बसवले आहे. आम्ही बाळासाहेब ठाकरेंच्या विचाराने पक्ष चालवत आहोत.

### निर्णयाकडे लक्ष

बुधवारी होणा-या सुनावणीमध्ये शिवसेना मूळ पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावर काय निर्णय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल. न्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायाधीश कोटेश्वर सिंह यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होणार आहे. तब्बल दीड वर्षानंतर याबाबत सुनावणी होत असल्याने पुढची तारीख मिळणार की अंतिम फैसला होणार याबाबत उत्सुकता असणार आहे.

# धनादेश वाटला नाही,पाच महिने सजा

**निर्णय:**ॲड.शशिकांत सावंत यांचा युक्तिवाद

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांनी कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंन्ट ॲक्ट अन्वय आरोपी कैलास दत्तात्रय सुरवसे यांना अनादरीत धनादेशाप्रकरणी धनादेशाच्या रकमेच्या डबल दंडाची शिक्षा त्याचप्रमाणे पाच महिन्याचे करावासाची शिक्षा सुनावलेले आहे.. सदर प्रकरणी फिर्यादी परमेश्वर रामभाऊ जमदाडे यांनी मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांच्या न्यायालयामध्ये समरी केस नंबर २६४३/२०१५ परमेश्वर विरुद्ध कैलास धनादेशाप्रकरणी प्रकरण दाखल केले होते सदर प्रकरणांमध्ये आरोपी कैलास सुरवसे यांनी फिर्यादी यांना त्यांच्याकडे असणाऱ्या उसनवार रकमेच्या बदल्यात रक्कम रुपये १८०००० चा.धनादेश दिला होता सदरचा



धनादेश वटवण्यासाठी बँकेत गेला असता सदरचा धनादेश आरोपीच्या खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने अनादरित झाला होता, म्हणून मा. न्यायालयात खटला दाखल करण्यात पान २ वर

## ट्रम्प हरले, ट्रम्प जिंकले!

एका देशाचा उचापतखोर नेता शेजारील देशाच्या निवडणुकीत इतका निर्णायक ठरतो याचे दुसरे उदाहरण सापडणे अवघड. पहिले कॅनडात २९ एप्रिलच्या निवडणुकीत जे काही झाले त्यात सापडावे. या निवडणुकीत सत्ताधारी 'लिबरल' पक्षाचे मार्क कार्नी विजयी झाले. या विधानातून पुरेसा बोध होणे अवघड. जानेवारीत ज्यास पंतप्रधानपदावरून पायउतार व्हावे लागले ते जस्टीन ट्रुडो आणि कार्नी हे एकाच पक्षाचे. ट्रुडो गेले दशकभर पंतप्रधानपदी होते. या काळात ते कॅनडाचा जागतिक चेहरा बनून गेले होते आणि त्यांचा 'लिबरल' पक्ष दशकभराच्या सत्तापभोगाने सुस्त झालेला होता. त्यातूनही गेली दोन वर्षे ट्रुडो यांच्यासाठी घसरगुंडीची ठरली. कॅनडाची अर्थव्यवस्था मरगळू लागलेली होती आणि ती चेतवण्यासाठी ट्रुडो यांस नवीन काही चमकदार राबवता येत नव्हते. साधारण दशकभराच्या सत्तेत कोणताही, कितीही कार्यक्षम असलेला नेता नावीन्य हरवतो आणि पहिल्यांदा सत्तेत येण्यासाठी जे केले त्याच्याच रेघोट्या ओढत राहतो. तथापि नवे काही करता न आल्यास नेतृत्वावरील परतावा उत्तरोत्तर घसरू लागतो. अशा वेळी काही भावनिक, विद्वेषी मुद्दा आवश्यक. नपेक्षा सदर नेत्याचा नेतृत्वदीप मंदावू लागतो. ट्रुडो यांनी भारताविषयी विद्वेष निर्मिती करून तो प्रयोग करून पाहिला. पण फसला. कारण हा काही हिंदू–मुसलमान, इस्रायली–पॅलेस्टाईन, गोरे विरुद्ध कृष्णवर्णीय इतका तीव्र विषय नाही. त्यामुळे तो फसला यात आश्चर्य नाही. परिणामी ट्रुडो यांची लोकप्रियता झपाट्याने घसरली आणि त्यातूनच जानेवारीत त्यांस पदत्याग करावा लागला. ट्रुडो यांच्यामुळे त्यांच्या पक्षाविषयीदेखील इतकी नाराजी होती की निवडणुकीत हा पक्ष हरणार हे स्पष्ट जाणवू लागले. तथापि एका राजकीय चमत्काराने वातावरण बदलले. तो घडला शेजारच्या अमेरिकेत. याआधी दोन महिन्यांपूर्वी निवडून आलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांचे राज्यारोहण झाले आणि ही 'वॉशिंग्टनची कुऱ्हाड' कशीही वेडीवाकडी फिरू लागली. तिचा पहिला फटका शेजारील कॅनडास बसला. अमेरिकेस खेटून असलेला हा देश आपण 'घेऊन' टाकावा असे ट्रम्प यांस वाटले. हे वाटणे मनातल्या मनात असते तर एक वेळ ठीक. पण कोणताही मागचा–पुढचा विचार न करता मनातले धाडकन बोलून टाकायचे हा ट्रम्प यांचा खाक्या. तो याहीबाबत दिसून आला आणि कॅनडास अमेरिकेचे ५१ वे राज्य म्हणून अंकित करून टाकण्याची इच्छा त्यांनी बोलून दाखवली. पाठोपाठ आला आयात कॅनडीयन उत्पादनांवर आयात शुल्काचा दणका. साहजिकच कॅनडात हलकल्लोळ उडाला. हंगामी पंतप्रधान कार्नी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्यावर टीकेची एकच झोड उठवली आणि ट्रम्प यांचे भाष्य हे कॅनडाचा मानभंग करणारे आहे, अशी भूमिका घेतली. इतकेच नाही तर कार्नी यांनी अमेरिकेशी काडीमोड घेऊन कॅनडाच्या अर्थव्यवस्थेतून लवकरात लवकर अमेरिकेस बेदखल करण्याची भाषा सुरू केली. कार्नी यांच्या गाठीशी बँक ऑफ कॅनडा तसेच बँक ऑफ इंग्लंडच्या गव्हर्नरपदाचा दांडगा अनुभव आहे. एक ज्येष्ठ बँकर या लौकिकामुळे त्यांच्या वक्तव्यात बोलभांड ट्रम्प यांच्यापेक्षा किती तरी अधिक शहाणपण होते. त्यामुळे ते पाहता पाहता लोकप्रिय झाले आणि त्यांच्या पक्षाचा शून्याखाली गेलेला आलेख पुन्हा झपाट्याने वर जाऊ लागला. अखेर ते विजयी झाले.

त्यांच्यापुढे आव्हान होते पीअर पॉइलीव्हर यांच्या 'कंझर्व्हेटिव्ह' या प्रतिगामी पक्षाचे. या पॉइलीव्हर यांचे वर्णन कॅनडाचे ट्रम्प असे केल्यास वावगे ठरणार नाही. वावदूकपणाबाबत दोघांतील साम्य कौतुकास्पद. प्रत्यक्षात औषधासाठी वापरणे अपेक्षित असलेले पण अमली पदार्थ म्हणून गैरवापर होते त्या फेंटानिल रसायनाच्या निर्मितीवर पूर्ण बंदी घालण्याची भाषा, धनाढ्यांवरील कर वाढवण्यास नकार, उदारमतवादी विद्यापीठांचे केंद्रीय अनुदान थांबवण्याचा इशारा इत्यादी मुद्द्यांमुळे हे पॉइलीव्हर चांगलेच लोकप्रिय होते. आर्थिक विपन्नावस्था अनुभवणारा समाज नेहमीच धार्मिक आणि सांस्कृतिक प्रतिगामींकडे आकृष्ट होत असतो. याची उदाहरणे अनेक. त्यामुळे पॉइलीव्हर हे कॅनडात चांगलेच लोकप्रिय होते. त्यात त्यांनी ट्रुडो सरकारवर भ्रष्टाचार आणि आर्थिक गैरव्यवस्थापनासाठी केलेली घणाघाती टीका त्यांच्या लोकप्रियतेत भर घालत होती. ट्रुडो यांच्या दहा वर्षांच्या सत्ताकाळात कॅनडाची अधोगतीच झाली आणि हे दशक राष्ट्रउभारणीच्या कार्यात पूर्ण वाया गेले ही त्यांची टीका कॅनडात बहुतेकांस स्वीकारार्ह होती. त्यामुळे पॉइलीव्हर यांचा विजय निश्चित मानला जात होता. पण झाले भलतेच. शेजारील अमेरिकेत ट्रम्प यांचा झंझावात आला आणि त्यात कॅनडातील प्रति–ट्रम्प पॉइलीव्हर यांचा राजकीय तंबू उन्मळून पडला. या निवडणुकीत त्यांच्या पक्षाची इतकी वाताहत झाली की खुद्द पॉइलीव्हर यांनाही पराभव पत्करावा लागला. गेल्या काही निवडणुकांच्या तुलनेत पॉइलीव्हर यांच्या 'प्रतिगामी' पक्षास मिळालेल्या मतांच्या प्रमाणात काहीशी वाढ झाली खरी, पण तिचे रूपांतर ते विजयात करू शकले नाहीत. या निवडणुकांतील आपल्या दृष्टीने आनंदाची बाब म्हणजे खलिस्तानवादी 'द न्यू डेमॉक्रॅटिक पार्टी'चा झालेला दारुण पराभव. जगमित सिंग यांच्या नेतृत्वाखालील या पक्षाच्या मत टक्केवारीत चार वर्षांपूर्वीच्या तुलनेत या वेळी चक्क डझनभर टक्क्यांची घट झाली. सत्ता बनवण्यात सहभागी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या पक्षास राष्ट्रीय राजकारणात आपले स्थान राखता येईल इतकीही मते पडली नाहीत. खुद्द सिंग यांसही पराभवाचा सामना करावा लागला. ही ब्याद तसेच पंतप्रधान ट्रुडो कॅनडाच्या लोकप्रतिनिधिगृहात आता नसतील. त्यामुळे भारत–कॅनडा यांच्यातील फाटलेले संबंध सुधारण्याची खात्री बाळगता येईल. भारतीय वंशाचे लाखो नागरिक आणि तितकेच भारतीय विद्यार्थी आज कॅनडात विविध अभ्यासक्रमांचे शिक्षण घेत आहेत. त्यांच्यासाठी उभय देशांचे संबंध सुधारले जाणे गरजेचे होते. जगमित–ट्रुडो यांच्या पराभवामुळे आणि त्याहीपेक्षा अधिक कार्नी यांच्या विजयामुळे संबंध सुधार प्रक्रियेस गती मिळेल. आपण ट्रुडो यांच्या विविध विषयांवरील धोरणांपासून फारकत घेऊ असे कार्नी यांनी गेल्या तीन महिन्यांत अनेकदा सूचित केले. एक यशस्वी बँकर या नात्याने कोठे गुंतवणूक केल्यास अधिक परतावा मिळतो याचे ज्ञान त्यांना अर्थातच इतरांपेक्षा अधिक असणार. त्यामुळे ट्रुडो यांच्याप्रमाणे काही भावनिक मुद्द्यांवर ते आपली ऊर्जा खर्च करणार नाहीत. तेव्हा कार्नी यांच्या उदयामुळे भारत–कॅनडा संबंधांचे नवे पर्व सुरू होण्याची शक्यता अधिक. विशेषत: यापुढे कॅनडाचे संबंध अमेरिकेशी पूर्वीप्रमाणे असणार नाहीत असे स्पष्ट विधान कार्नी यांनी केलेले असल्याने त्यांना नवीन व्यापार भागीदारांची गरज अधिक असणार हे उघड आहे.

# संत बंकटस्वामी महाराजांचा महोत्सवाचे

## आवाहन:श्रीक्षेत्र नेकनुरमध्ये अवतरणार भक्तीपंढरी

पुण्यभूमी प्रतिनिधी

नेकनुर:वारकरी सांप्रदायाचे भक्ती सूर्य स्वानंद सुखनिवासी जोग महाराज यांचे पट्ट शिष्य महान संत श्रीगुरु वै.बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी महोत्सवा निमित्त श्री क्षेत्र नेकनूर येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे . दि ६ मे २०२५ वार मंगळवार ते दिनांक १३ मे २०२५ वार मंगळावर या आठ दिवसाच्या कालावधीमध्ये भव्य ज्ञानयज्ञ संपन्न होणार आहे. यात २४ तास अखंड अन्नदान आणि ज्ञानदान सोहळा होणार आहे.. याचा सर्व भाविक भक्तानी लाभ घ्यावा.

यात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भागवत कथाकार प पू भास्करगिरी महाराज देवगडकर यांचे उत्तराधिकारी श्री ह भ प स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांची सात दिवस भागवत कथा होणार आहे . तसेच महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकारांचे कीर्तने होणारं आहेत .या सर्व कार्यक्रमाचा भावीक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती



बंकटस्वामी मठ नेकनुर , पंढरपूर , आळंदी,विश्वस्त ,अन्नदान कमिटी ,गावकरी मंडळी नेकनुरकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात दि– ६ मे पासून सुरुवात होणार आहे यात आठ दिवस कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे..पहाटे ४ ते ६ काकडा भजन ,सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण , १० ते १२ गाथा भजन , दुपारी १२ ते २ भोजन ,२ ते ५ भागवत कथा, ५ ते ६ हरीपाठ रात्री ८.३० ते १०.३० हरिकिर्तन व ११ नंतर संगीत भजन व हरीजागर होईल .

यात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध श्री ह भ प स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांचे सूश्राव्य भागवत कथा होणार आहे.तसेच महाराष्ट्रातिल नांमाकित कीर्तनारांची किर्तने व संगीत भजन,प्रवचन आदि कार्यक्रम होनार आहेत . दिनांक ६ मे २०२५ रोजी सकाळी ८ वाजता बंकटस्वामींच्या पालखीची नेकनूर येथिल बंकटस्वामी शिक्षक कॉलनी येथून भव्य शोभा यात्रा निघणार आहे. या सप्ताहा दरम्यान पहिल्या दिवशी श्री ह.भ.प. शांतीब्रह्म महादेव महाराज चाकरवाडीकर, दुसरा दिवस ह.भ.प. बाळकृष्ण महाराज वसंतगडकर , तिसरा दिवस ह भ.प. महंत गुरुवर्य विठ्ठल महाराज गहिनीनाथगडकर, चौथा दिवस ह भ प चैतन्य महाराज निंबोळे नाशिक, पाचवा दिवस ह.भ.प. भागवताचार्य समाधान महाराज शर्मा, सहावां दिवस ह.प.भ. उल्हास महाराज सूर्यवंशी, सातवा श्री ह.भ.प. रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर ,यांचे रात्री ८.३० ते १०.३० किर्तन होईल .दिनांक १३ मे रोजी श्री ह.भ.प.ज्ञानसिंधू संदीपान महाराज हसेगावकर अध्यक्ष वारकरी शिक्षण संस्था आळंदी देवाची यांचे सकाळी ११ ते १ काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर महाप्रसाद वाटप होईल . तरी भाविक भक्तांनी या किर्तनाचा व भागवत कथेचा लाभ घ्यावा असे आवहन करण्यात आले आहे.

### सप्ताहात बंकटस्वामी संस्थान करणार मुलींचे कन्यादान

बंकटस्वामी संस्थांच्या वतीने यावर्षी विवाह सोहळा आयोजित करण्यात येणार आहे, सप्ताहाच्या आठ दिवसाच्या कालावधीत बंकटस्वामी संस्थान लग्नाचा खर्च उचलून संसार उपयोगी साहित्य देऊन कन्यादान करणार असल्याने परिसरातील इच्छुक वर वधू पित्यांनी याचा लाभ घेऊन आपल्या मुला मुलींचे विवाह सप्ताहात करण्याचे आवाहन ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे विश्वस्त व अन्नदान कमिटी, ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान एक वरून

**आंबा खाताय,सावधान!**

शक्यतो विश्वास असलेल्या ठिकाणी आंबे खरेदी करताना त्या विक्रेत्याने साठवून ठेवलेल्या गोडाऊनमध्ये एक वेळेस अवश्य भेट द्यायला हवी जेणेकरून ती वापरत असलेले रंग केमिकल तेथे उपलब्ध आहे का नाही हे समजल.

**महापालिका निवडणुकांचे**

राजवट आहे. सर्वच राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि त्यामध्ये ओबीसी आरक्षण हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सर्वोच्च न्यायालयासमोर हे प्रकरण प्रलंबित असल्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी चार–चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाही. देशात लोकसभेपाठोपाठ राज्यात विधानसभा निवडणूक झाली. त्यानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होतील, यावर सर्वत्र चर्चा सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणाचा मुद्दा रखडल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. या याचिकेच्या माध्यमातून निवडणुका घेण्यासंदर्भात विनंती न्यायालयाकडे करण्यात आली. तर ओबीसी आरक्षण असो किंवा नसो मात्र निवडणुका व्हाव्यात, अशी याचिकाकर्त्यांनी मागणी आहे.

**बापानेच काढला मुलाचा**

घालून त्याचा खून केला.घटनास्थळी माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहूल सुर्यतळ, पोलीस पोउपनि आकाश माकणे व इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून प्रेत उत्तरीय तपासणीसाठी माजलगाव ग्रामीण रुग्णालयात पाठवले आहे. आरोपीला पोलीसांनी घटनास्थळाहून अटक केली आहे.

**आज बारावीचा निकाल**

दहावीचा निकाल १५ मे पूर्वी दहावीचा निकाल देखील लवकरच जाहीर होणार असल्याचे बोलले जात आहे. दहावीच्या परीक्षेचा निकाल मे महिन्याच्या दुस–या आठवड्यात म्हणजेच १५ मे पूर्वी घोषित केला जाऊ शकतो. मार्च महिन्यात परीक्षा संपल्यानंतर आता सर्व विद्यार्थ्यांना निकालाची प्रतीक्षा लागली आहे. मात्र अद्याप मंडळाकडून निकालाची अधिकृत तारीख जाहीर करण्यात आलेली नाही.

**महाराष्ट्रावर अवकाळी पावसाचे**

बीड, नांदेड, या जिल्ह्यांत १० मेपर्यंत ढगाळ वातावरण राहील. काही ठिकाणी एखाद–दुस–या दिवशी विजांचा गडगडाट, वा–यासह पावसाची शक्यता आहे. या वातावरणाचा प्रभाव विदर्भातील जिल्ह्यांत जाणवू शकतो. तसेच, गारपिटीचीही शक्यता आहे. मुंबईत सकाळी आकाश ढगाळ असेल, तर दुपारी निरभ्र राहील.

**बाजीराव चव्हाणांच्या मदत**

विचारांना प्रामुख्याने पुढे नेण्याचे काम कोणी करत असेल तर ते बाजीराव दादा आहेत.असे गौरवउद्गार काढले.याप्रसंगी धर्मवीर प्रतिष्ठानचे जिल्हाअध्यक्ष लिंबाजी मामा जाधव, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हाप्रमुख महादेव मातकर,युवानेते अण्णा शिंदे,विलास मस्के,प्रसाद चव्हाण,सचिन गाडे, संदीप माने,जोतिराम फरताडे यांच्या सह धर्मवीर प्रतिष्ठानचे सर्व सहकारी व मित्रपरिवार उपस्थित होता.*

**धनादेश वाटला नाही,पाच**

आला सदर प्रकरणात फिर्यादीच्या वतीने युक्तिवाद ग्राह्य धरून मा. न्यायालयाने आरोपी कैलास सुरवसे यास धनादेशाच्या डबल रक्कम ३६०००० रु. उदंड व पाच महिन्यांच्या करावासाची सजा दिलेली आहे, फिर्यादीच्या वतीने ड. शशिकांत सावंत यांनी बाजू मांडली, त्यांना ड. अभिषेक बहिर, ड. माऊली डाके, ड. प्रदीप दराडे, ड. राजकुमार धरणे, ड. मुकुंद लोणकर, ड. राम खोसे यांनी सहकार्य केले.

**शिवसेना पक्ष ठाकरेंचा का**

वेगवेगळे चिन्ह दिले होते. मात्र, पुढे निर्णय देताना निवडणूक आयोगाने शिवसेना मूळ पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदेंना देण्याचा निर्णय घेतला होता.तत्कालीन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी देखील शिंदेंच्या बाजूने फैसला दिला होता. त्यांच्या निर्णयामुळे एकनाथ शिंदेंसोबत असलेले आमदार अपात्र ठरले नव्हते. तसेच विधिमंडळातील शिवसेना पक्ष एकनाथ शिंदेंकडे राहिला होता. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुती पुन्हा सत्तेत आली. शिंदेंचे उमेदवार धनुष्यबाण चिन्हावर लढले होते.

# धनगर जळका ग्रामपंचायत समोर निषेध आंदोलन

पाटोदा/प्रतिनिधी

दिनांक एक मे रोजी लेखी निवेदन देऊनही व पंचायत समितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लेखी आदेश असतानाही ग्रामपंचायत कार्यालय धनगर जवळका यांनी जाणीवपूर्वक ग्रामसभा ही पुढे ढकलली. तसेच गावातील अनेक प्रश्न प्रलंबित असताना गावातील निधी कुठे खर्च केला जातो याची कुठलीही माहिती गावातील नागरिकांना उपलब्ध करून दिली जात नाही ती माहिती उपलब्ध करून द्यावी २०२३ ते २०२५ या कालावधीत आलेला निधी कुठे गेला.साधारणपणे वित्त आयोगाचा पाच वर्षाचा तीस लाख रुपये एवढा निधी आहे तसेच गावाला स्वच्छता पुरस्कारामधून मिळालेले दहा लाख रुपये असे एकूण ४० लाख रुपये ग्रामपंचायतीच्या हातात असताना व इतर योजनेचेही मोठ्या प्रमाणात रक्कम ग्रामपंचायतला मिळत असताना पावसाळ्याच्या तोंडावर काम मात्र शून्य दिसत आहे.

गावामध्ये सहा प्रकारचे सव्वा कोटी रुपये किमतीचे खडीकरणाचे रस्ते मंजूर असून त्याचे जवळपास पंधरा लाख रुपयापर्यंत रक्कम उचलली आहे परंतु साबळे वस्ती ते सांगळे वस्ती हा रस्ता सोडता इतर कुठल्याही रस्त्यावर खडीचा एकही खडा ही टाकला नसून गावातील नागरिकांना पावसाळ्यात मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. या सर्व गोष्टींची ग्रामपंचायतला जाणीव होण्यासाठी प्रकाश खाडे यांनी हे निषेध आंदोलन केले.

## पान सहा वरून

**...तर पाच लाख रुपये बक्षीस**

ध्वजारोहन करण्यात आले. पांडुरंग नाना राख यांणी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक नागरगोजे सर यांणी केले. जि.प. शाळेचा निकाल भारती मॅडम यांणी जाहिर केला. यावेळी व्यासपिठावर मा.सौ. मोनाली अरुण धुरंधरे, समाजसेवक पांडुरंग नाना राख, ग्रामपंचायत अधिकारी दिपक लांडे, अंकुश आण्णा खाडे, दिलिप खाडे, अंकुश तांदळे, आजिनाथ खाडे, नागरगोजे सर, भारती मॅडम, नागरगोजे मॅडम, भुतकर सर, जाधव सर, आंधळे सर, डोंगरे सर, वनवे मॅडम, कुटे मॅडम, तांदळे मॅडम, राख मॅडम, मोराळे मॅडम, कुटे मॅडम, घरत सर, तांदळे सर, बेग सर, नागनाथ सातपुते, तात्याराम बाप्पु, नंदु पवळ, दिनकर तांदळे, सौ. सुरेखा घोडके उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बिनवडे सर, हानुमंत दादा तांदळे, प्रदिप बाप्पु तांदळे, वाघमारे डि.डि. लक्ष्मण शेंडगे यांणी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन लोमेश तांदळे सर यांणी केले.

**पेरणीपूर्वी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवा!**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना अंतर्गत लाभार्थ्यांना वेळेत लाभ देण्यात यावा अशा सूचना पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी संबंधीतांना दिल्या.तसेच जिल्ह्यातील ज्या गावातून टँकरची मागणी होताच, त्या गावास तात्काळ पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच टँकर, पुरक नळ योजना, विहिर अधिग्रहण इत्यादी उपाययोजनांद्वारे सर्वसामान्य नागरिकांना पाणी टंचाईचा त्रास होणार नाही याची जिल्हा प्रशासनाने दक्षता घ्यावी असे निर्देश ही पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले. जिल्ह्यात ६ लाख २९ हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाच्या पेरणीसाठी नियोजन आज सादर करण्यात आले. त्यात सर्वाधिक क्षेत्रावर म्हणजेच २ लाख २१ हजार हेक्टरवर सोयाबीन तर २ लाख ९१ हजार हेक्टर क्षेत्रावर कापूस या पिकांचे नियोजन करण्यात आले आहे. कापूस आणि सोयबीन पिकासाठी बियाण्यांची उपलब्धता करण्यात आली आहे. जिल्ह्यात कापूस पिकाच्या नियोजित क्षेत्रावर पेरणीसाठी बियाण्यांची ११ लाख ५१ हजार पाकिटे लागणार आहेत. त्याचे नियोजन करण्यात आले असून, सोयाबीन पिकासाठी ६५ टक्के घरच्या बियाण्यांचा वापर होणार आहे. तसेच उर्वरीत ३५ टक्के म्हणजे ५७ हजार ५६५ क्विंटल बियाण्यांचे नियोजन करण्यात आले आहे. सोबतच खरीप ज्वारी, मुग, तूर, उडीद, भुईमूग, सूर्यफुल, तीळ या पिकांच्या पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे. या सर्व पिकांच्या लागवडीसाठी ७३ हजार ०७६ क्विंटल बियाण्याची आवश्यकता असून, त्याची मागणी नोंदविण्यात आली आहे. तसेच खरिप हंगामाकरीता आवश्यक व अपेक्षित बियाणे, खते, किटकनाशके यांचे योग्य नियोजन कृषी विभागामार्फत करण्यात आल्याचे यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जी. आर. कापसे यांनी सांगितले. बैठकीच्या प्रारंभी पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते जालना कृषी विभागाच्या व्हॉटस् अप चॅनल आणि घडिपत्रिकाचे विमोचन करण्यात आले. यावेळी बैठकीस उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक प्रेषीत मोघे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था परमेश्वर वरखडे, कृषि विकास अधिकारी प्रभाकर बनसावडे, सर्व उपविभागीय कृषी अधिकारी व सर्व तालुका कृषि अधिकारी यावेळी उपस्थिती होते.

**कामगारांना योजनांचा लाभ**

आणि अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांना लाभ मिळवून देणे असा आहे. जसे की ग्रामीण भागातील कामगार, कृषी कामगार, वीट भट्टी कामगार, बांधकाम कामगार, घरेलू महिला कामगार, कचरा गोळा करणारे, स्थलांतरित कामगार, गाडी चालवणारे कामगार, आणि मनरेगा कामगार यांचा यामध्ये समावेश असणार आहे. भारतामध्ये करोडो कामगार आजही पीएम–स्वनिधी, आयुष्मान भारत, उज्ज्वला योजना, पेन्शन योजना, सार्वजनिक वितरण प्रणाली, महिलांसाठी मासिक सहाय्य योजना आणि बांधकाम कामगार कल्याण मंडळ यांसारख्या योजनांपासून वंचित आहेत. याचे मुख्य कारण जागरूकतेचा अभाव, कागदपत्रांचा अभाव, डिजिटल साक्षरतेचा अभाव आणि संस्थात्मक सहाय्याची अनुपलब्धता आहे. या मोहिमेचा उद्देश फक्त तात्कालिक नोंदणी सहाय्य देणे नाही तर एक दीर्घकालीन समर्थन यंत्रणा स्थापित करणे आहे. ज्यामुळे कामगार कायमस्वरूपी सशक्त होऊ शकतील. अशा या नाविन्यपूर्ण उपक्रमामध्ये आझाद क्रांती कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांनी सहभागी व्हावे असे आवाहन दि.०१ मे आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त गेवराई तालुक्यातील राजपूर येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात संघटनेचे अध्यक्ष कडूदास कांबळे यांनी केले आहे. या कार्यक्रमामध्ये आझाद क्रांती कामगार युनियनच्या उपाध्यक्ष मंगलताई पवार आणि सचिव कविताताई डोंगरे यांनीही आपले विचार व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आझाद क्रांती कामगार युनियनचे गेवराई तालुका संघटक शाहीरखाँ चांदखाँ पठाण आणि असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगार पठाण अंजुम, चव्हाण राजूबाई, सविता गवते, भागीत्रा गवते, मंदा पाटेकर, सीमा लोखंडे, राणीबाई जाधव, मंगल गवते, मंगल वाघमारे, अलका वायभासे, मनीषा शिरसाट, पठाण बेबी, शेख बेबी, पठाण सलमा, यशोदा लोखंडे, शिवकन्या लोखंडे, गीता चव्हाण, गजराबाई काळे, आशाबाई गर्जे, जाधव विजयमाला, गयाबाई गर्जे, गयाबाई गवते, सीमाताई लोखंडे, सविता लोखंडे, पूजा वाघमारे, आशा वाघमारे, मोनिका गवते, आशा गवते, मंगलताई वाघमारे, राणूबाई जाधव, मुक्ताबाई गवते, चंद्रकला गवते, स्वाती गवते, वच्छला चव्हाण, अलका चव्हाण, मुक्ताबाई गवते, शिलाबाई चव्हाण, द्वारका बेडके, सुषमा औंडकर, विठाबाई करांडे यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन बंडू उरुणकर यांनी केले.

**पैसे घेतल्याशिवाय फाईल**

करण्यात यावे असे चर्चा सत्र केज तालुक्यातील नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे तसेच एक घरकुलाच्या सर्वेक्षण करण्यासाठी एक हजार रुपये तर असे गावातील लाखो रुपये लुटमार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई बीड जिल्हा परिषद सीईओ यांनी केली पाहिजे तसेच अशा प्रकारे घरकुल योजनेच्या सर्वेक्षण करण्याच्या नावाखाली केज तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी यांनी बाजार मांडला आहे तसेच एक हजार रुपये दीले तर सर्वेक्षण करण्यात येईल नाहीत करणार नाही असे ग्रामपंचायत अधिकारी, कर्मचारी यांनी लुटमार सुरू केली आहे तरी बीड जिल्हाधिकारी, बीड जिल्हा परिषद सीईओ यांनी अशा लाचलुचपत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**युवक आघाडी सुवर्ण**

सौजन्याने असतील ,प्रवास खर्च अंतरावर ठरविला जाईल या स्पर्धा मॅटवर होतील स्पर्धेसाठी प्रवेश फीस ५०० रुपये असून नोंदणी अंतिम दिनांक ८ मे २०२५ आहे, टीम साठी जेवणाची व राहण्याची व्यवस्था शिवाजी आप्पा कापसे सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती व कृषी उत्पन्न आडत व्यापारी असोसिएशन यांच्या वतीने करण्यात येईल संघ नोंदणी संपर्क लक्ष्मण मोहिते ,साजिद चाऊस ,फुलचंद कदम ,सुबराव कांबळे ,रवी उबाळे ,यांच्याशी करावा असे आवाहन युवक आघाडी संस्थापक अध्यक्ष यशवंत दशरथ व स्पर्धा संयोजन समिती सचिव डॉ.अभिजीत लोंढे यांनी केले आहे.

**महावली कॉटन इंडस्ट्रीजला**

कापूस, रुई जळून तीस लाखांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. वेळीच कृषी उत्पन्न बाजार समितीची अग्निशमन व नगरपरिषद अग्निशमन दल गाडी पोहोचल्याने आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन दलाला यश आले आहे. घटनेची माहिती मिळताच अनेक टँकर धारक त्या ठिकाणी आग विझवण्यासाठी मदतीसाठी धावून आले. जिनिंग मध्ये उपस्थित असलेले सर्व कामगार व शेतकरी आग विझवण्यासाठी मदत करू लागले. सर्वांच्या मदतीने आग विझवण्यात यश आले परंतु या घटनेमध्ये तीस लाखांच्यावर नुकसान झाले असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अद्याप पर्यंत गेवराई पोलीस घटनास्थळी पोहोचले नसून अग्निशमनच्या कार्यतत्परतेमुळे आग विजवण्यात यश आले आहे.

**माल निघालाय पण भाव**

येथील शेतकऱ्यांना कांदा पिकाने साथ दिली नाही. मुळुकवाडी येथील कांदा उत्पादक शेतकरी जालिंदर सुर्यभान ढास यांनी यावेळी माल निघलाय पण भाव नाही,अडीच एकर कांदा लागवड केली होती.२०० पोते कांदा बेंगलोरच्या बाजारात विकला, सध्या ११ रूपये किलो भाव असुन वाहतूक खर्च,आडत, हमाली आदी जाऊन ५–६ रूपये भाव पडत असल्याचे सांगत बारदाणा आणि पिशव्या भरायला परवडत नसल्याची खंत व्यक्त केली.

**दारु अड्ड्यावर दोन ठिकाणी**

शाखेचे विठ्ठल चव्हाण, पोलिस नाईक सुग्रीव रूपनर, यांनी कारवाई केली आहे.पोलिस नाईक सुग्रीव रूपनर फिर्यादीवरू गंगुबाई सुभाष काळे,अशा कालीदास काळे,रा अंबिका नगर तलवाडा यांच्या विरोधात कलम ६५ (ई) (फ) म. महाराष्ट्र दारू बंदी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संपादक : बाळासाहेब भगवान मस्के, कार्यकारी संपादक : सुनिल मसू डोंगरे

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भागवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122

Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com




## महापारेषण कंपनीच्या कारभाराविरोधात सर्व पक्षीय आंदोलन

**कल्याण :** कल्याण तालुक्याच्या ग्रामीण भागातील खडवली, चिंचवली, उतणे, रुंदे, म्हस्कल, गोवेली, वाहोली, वसत, शेलवली यांसह १३ गावातून महापारेषण कंपनीच्या विद्युत वाहिन्या टाकण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. मात्र हे काम करत असताना कंपनीकडून शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या सुचना, नोटीस व मोबदला न देता मनमानी व जबरदस्तीने महापारेषणकडून काम केले जात असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. या कामाला शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असून, या संदर्भात शेतकऱ्यांना तालुक्यातील सर्व पक्षीय नेत्यानी पाठिंबा दर्शविला असून विविध पक्षांचे नेते व कार्यकर्ते वाहोली येथील शेतकऱ्यांच्या आंदोलनात सहभागी झाले. यावेळी तालुक्यातील शेकडो बाधीत शेतकरी व विविध पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी महापारेषण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांच पत्र देण्यात आले. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये म्हणून कल्याण तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम, यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी चोख बंदोबस्त तैनात केला होता.

# माजिवडा उड्डाणपुलावर वाहनांना १९ दिवस प्रवेश बंदी!

### वाहतुकीवर वाढणार ताण; चालकांनी नियमांचे पालन करावे

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

मुंबई, नाशिक, गुजरात मार्गावरील वाहतुकीसाठी महत्त्वाचा समजला जाणारा माजीवाडा उड्डाणपूल वाहतुकीसाठी १९ दिवस बंद राहणार आहे. पुलावरील रस्त्यावर यंत्राद्वारे मास्टिकचे काम केले जाणार आहे. त्यामुळे मुंबई घोडबंदर मार्गीकेवर रात्रीच्या वेळेत केल्या जाणाऱ्या कामासाठी हा पूल सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे. २२ मे पर्यंत बंद ठेवण्यात आलेल्या पुलावरील वाहतुकीचा ताण पुलाखालील वाहतुकीला बसणार आहे. माजीवाडा उड्डाणपूल हा मुंबई नाशिक आणि गुजरातकडे जाणाऱ्या वाहतुकीचा महत्त्वाचा मार्ग आहे. हजारोंच्या संख्येने या अकोला वरून सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतूक होते. पुलावरील वाहनांच्या ताणामुळे रस्त्यावरील डांबर वितळल्याने रस्तावर खाली झाला आहे. त्यामुळे पावसाळा पूर्वी रस्त्याची दुरुस्त करणे महत्त्वाचे असल्याने पुलावरील रस्त्यावरचे मास्टिक खरडून काढले जाणार आहे, हे काम मिलिंग मशीनद्वारे केले जाणार आहे. मास्टिक खरडून काढल्यानंतर त्यावर नवे मास्टिंग केले जाणार असल्याने हा मार्ग १९ दिवस (३ ते २२ मे) वाहतुकीसाठी बंद ठेवला जाणार आहे. रात्री ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत काम चालणार आहे. पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाल्यानंतर पुढील काम करण्यात येणार असून वाहन चालकांनी नियमांचे पालन करायचे आहे असे वाहतूक विभाग उप आयुक्त पंकज शिरसाट यांनी सांगितले.



- **प्रवेश बंद :** घोडबंदर मुंबई मार्गावर तत्त्वज्ञान पूल चढणी पुलावरून मुंबई अथवा नाशिककडे जाण्यास प्रवेश बंद आहे.
- **पर्यायी मार्ग :** या मार्गाचा वापर करणारी सर्व वाहने स्लीप रोडने कापूरबावडी सर्कल मार्गे जातील.
- **प्रवेश बंद :** भिवंडी-मुंबई वाहिनी बाळकुम अग्निशमन पूल चढणी येथून पुलावरून मुंबई अथवा नाशिककडे जाणारा मार्ग बंद असणार आहे.
- **पर्यायी मार्ग :** ही वाहने ही स्लीप रोडने कापूरबावडी सर्कल मार्गे जातील.

### संशयाची सुई औद्योगिक क्षेत्राकडे?

## नाल्यांमधील प्रदूषणकारी पाण्याची तपासणी सुरू



◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

उल्हास, वालधुनी या नद्यांमध्ये प्रदूषण घडवून आणणाऱ्या नाल्यांमध्ये प्रदुषके, रसायने यांचे प्रमाण नेमके किती आणि कोणत्या स्वरूपाचे आहे हे जाणून घेण्यासाठीची प्रकिया महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुरू केली आहे. यासाठी बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण येथील नाल्यांमधील पाण्याचे ७० नमुने घेण्यात आल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्पष्ट केले आहे. यामुळे नाल्यांमध्ये नेमके कोणते प्रदुषणकारी रासायनिक घटक आहेत हे स्पष्ट होणार असून ते नेमके कोणत्या स्रोतांकडून येतात याचाही अंदाज येण्याची शक्यता आहे.

उल्हास, वालधुनी या नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रासायनिक व घरगुती सांडपाण्याच्या स्रोतांकडून गेले अनेक वर्षे प्रदूषण होत आहे. हे प्रदूषणकारी स्रोत हे प्रामुख्याने बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण येथील नाले आहेत. औद्योगिक क्षेत्रातूनही बरचशी रसायनं विना प्रक्रिया या नद्यांमध्ये जात असल्याचे आढळून आले असून अनेक जीन्स धुलाई कारखान्यांचे पाणीही अवैधरीत्या उल्हास आणि वालधुनीमध्ये जात आहे. या पार्श्वभूमीवर गेले अनेक दिवस माध्यमांमधून ओरड व्यक्त केली जात होती. तसेच, पर्यावरणवाद्यांनीही आंदोलनाच्या माध्यमातून या नदी प्रदूषणाविरोधात आवाज उठवला होता. अखेर, जाग्या झालेल्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नाल्यातील प्रदूषणकारी घटकांची माहिती घेण्याचे ठरवले आहे. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कल्याण विभागाचे प्रादेशिक अधिकारी राजेंद्र राजपूत यांना विचारले असता ते म्हणाले की, "आम्ही नाल्यांमधील पाण्याचे ७० नमुने घेतले आहेत. त्यांचे परिक्षण केले जाणार आहे. येत्या ३ - ४ दिवसांत त्याचा अहवाल प्राप्त होईल. ही तपासणी दरमहा केली जाणार आहे."

दरम्यान, नाल्यांमधून घेण्यात आलेल्या नमुन्यांमध्ये नेमके कोणते प्रदूषणकारी घटक आढळतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. कारण, या नमुन्यांमध्ये औद्योगिक क्षेत्रातून सोडल्या जाणाऱ्या रसायनांचे अंश आढळल्यास नदी प्रदूषणाची संशयाची सुई बदलापूर, अंबरनाथ, कल्याण इथल्या औद्योगिक क्षेत्राकडे जाण्याची शक्यता आहे.

## उल्हासनगरात कॅन्सर मोबाइल व्हॅनमार्फत तपासणी

◆ **उल्हासनगर (वार्ताहर) :**

उल्हासनगर पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाने शहराला कॅन्सर मुक्त करण्यासाठी पुढाकार घेतला असून १३ ते १६ मे पर्यंत कॅन्सर मोबाइल व्हॅन मार्फत कर्करोग तपासणी करण्यात येणार आहे. तसेच ही व्हॅन ४ प्राथमिक आरोग्य केंद्रांवर उपलब्ध असणार आहे अशी माहिती वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. मोहिनी धर्मा यांनी कळवली असल्याचे जनसंपर्क अधिकारी अजय साबळे यांनी सांगितले.

जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद ठाणे यांच्या ३० एप्रिलच्या पत्रानुसार पालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांकरिता कॅन्सर मोबाइल व्हॅनमार्फत कर्करोग तपासणी शिबीर आयोजित करण्याचे निर्देश मिळाले आहेत.त्यानुसार आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या गाईडलाईन नुसार आणि अतिरिक्त आयुक्त किशोर गवस,वैद्यकीय आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. विजय खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गोलमैदान येथे तज्ञ डॉक्टर राहुल खुरंगळे, महात्मा फुले नगर येथे तज्ञ डॉक्टर पूजा गुंडेकर, कॅम्प नंबर ४ ओ. टी. सेक्शन येथे तज्ज्ञ डॉक्टर शुभांगी देवरे आणि नेताजी चौक येथे तज्ज्ञ डॉक्टर रवींद्र भगत यांच्या उपस्थितीत या चारही प्राथमिक आरोग्य केंद्रात कॅन्सर मोबाइल व्हॅनमार्फत कर्करोग तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या ठिकाणी या मोहिमेची जनजागृती करणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी वैद्यकीय आरोग्य विभागाच्यावतीने नागरिकांना या महत्त्वपूर्ण कर्करोग तपासणी शिबिराचा लाभ घेण्यासाठी अवगत करण्याकरिता जनजागृती करावी तसेच कर्करोग तपासणी शिबीर यशस्वीपणे राबवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत अशा सूचना वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. मोहिनी धर्मा यांनी दिल्या आहेत.



## वेचक

### पॅथॉलॉजी विषयात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचा सत्कार



**ठाणे :** महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठातून पॅथॉलॉजी (शरीर विकृतीशास्त्र) विषयाच्या राज्याच्या गुणवत्ता यादीत पहिले तिन्ही क्रमांक ठाणे महापालिकेच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी पटकावले आहेत. पहिला क्रमांक डॉ. अश्विनी जेनिशा, दुसरा क्रमांक डॉ. पूजा कटरे आणि तिसरा क्रमांक डॉ. सायली लखोटे या विद्यार्थिनींना मिळाला. ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी या तिन्ही विद्यार्थिनींचा सत्कार केला. ठाणे महापालिकेचे राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ, नाशिक यांच्याशी संलग्न पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झाला आहे. या अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या बॅचमधील शरीर विकृतीशास्त्र आणि सामाजिक वैद्यकशास्त्र (कम्युनिटी मेडिसीन) या विषयात महाविद्यालयाच्या एकूण सहा विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी परीक्षेत नेत्रदीपक यश मिळाल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. राकेश बारोट यांनी दिली.

### ठाण्यातील 'न्यू इंग्लिश स्कूलचा' शतक महोत्सव

**डोंबिवली :** ठाणे शहरातील पीपल्स एज्युकेशन सोसायटीची न्यू इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज सदर शाळांचा येत्या १५ जूनला १०० व्या वर्षात पदार्पण करत आहेत, तर इंग्लिश मीडियम प्रायमरी स्कूल, कोपरी ठाणे पूर्व या संस्थेच्या शाळा जूनमध्ये ५० व्या वर्षात पदार्पण करत आहे. याचे औचित्य साधून वर्षे भर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. डॉक्युमेंटरी फिल्म तयार करून वाटचाल व उन्नती कशा प्रकारे झाली यांची प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तसेच शैक्षणिक विषयांवर परिसंवाद सुद्धा आयोजित करण्यात येणार आहेत त्यामध्ये शिक्षण क्षेत्रातील नामांकित व्यक्तीचा सहभाग असेल.

### आंब्याच्या पेटीत आढळले घोरपडीचे पिल्लू



**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील वायलेनगर परिसरात आंबे विक्रेत्याच्या आंबाच्या पेटीत साप सदृश्य जीव आढळल्याने भीतीने विक्रेत्याची धादंल उडाल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच घडला. या घटनेसंदर्भात सर्प मित्र दत्ता बोंबे यांना विशाल गायकर याने घोणस साप आहे असे सांगितल्याने तातडीने घटनास्थळी सर्पमित्र दत्ता बोंबे यांनी तिथे जाऊन पाहिले, तर आंब्याच्या पेटीतील आंब्याच्या आडोशाला लपलेल्या घोरपडीच्या पिल्लाला सुखरूप बाहेर काढले आणि उपस्थितीतांनी सुटकेचा निश्वास टाकला. सर्पमित्र दत्ता बोंबे यांनी जीवनदान दिलेल्या घोरपडीच्या पिल्लास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

### गुलाबी कातकरी वाडी येथे विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप!



**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात यशस्वी झालेल्या गुलाबी कातकरी वाडीत महावीर इंटरनॅशनल पवई यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात २० विद्यार्थ्यांसाठी सायकली वाटप करण्यात आल्या. तसेच वाडीतील सर्व महिलांना दर्जेदार चप्पला, ताटे तसेच शाळकरी मुलांना टी-शर्ट, दफ्तर खाऊ या वस्तू भेट देण्यात आल्या. यावेळी संस्थेचे संस्थापक रणजित सिंग कुमट, अध्यक्ष अमित जैन, उपाध्यक्ष राजू शर्मा, सचिव विनोद कुमट, खजिनदार सुनील चौधरी, सदस्य अजित जैन, मोनिका जैन, इशाका जैन, सरिता जैन यांनी मेहनत घेतली.

## बदलापूरकरांचे पिण्याचे पाणी महाग

◆ **बदलापूर (वार्ताहर) :**



अंबरनाथ आणि बदलापूर शहरातील नागरिक राज्यातील सर्वात महागडे पाणी पीत असल्याचा खळबळजनक खुलासा भाजपाचे महामंत्री संभाजी शिंदे यांनी केले आहे. त्याचवेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून या दोन शहरांमध्ये नफ्याचा धंदा केला जात असून या प्राधिकरणाचा कारभार 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर असावा अशी मागणीही शिंदे यांनी केली आहे. दोन्ही शहरातील पाण्याची गळती सुमारे ३० टक्के असून भांडवली कामांसाठी प्राधिकरण कोणताही खर्च करत नाही असाही आरोप शिंदे यांनी केला आहे. दोन्ही शहरात जीवन प्राधिकरणाच्या कामावर नागरिकांची नाराजी आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून अंबरनाथ आणि बदलापूर या दोन शहरांना पाणी पुरवठा केला जातो. प्राधिकरण येथील पाणी वितरण, देखभाल दुरुस्ती, जल उदंचन, जल शुद्धीकरण प्रकल्प चालवणे अशी कामे करते. त्याचवेळी प्राधिकरण शहरातून दरवर्षी १० कोटी रुपयांचा नफा प्राप्त करत आहे. वास्तविक महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपरिषदा आणि पालिका यांच्याकडे स्वतःचा पाणीपुरवठा विभाग आणि नियंत्रण आहे. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था या पाणी योजनांसाठी तसेच पाणी पुरवठ्यासाठी स्वतःच्या स्वनिधी आणि उत्पनातून खर्च करून नागरिकांना सवलतीच्या दरात पाणीपुरवठा करत असतात. जीवन प्राधिकरण मात्र अंबरनाथ आणि बदलापूर शहरातून दरवर्षी १० कोटी रुपयांचा निधी (नफा) प्राप्त करत आहे, असा दावा भाजपाचे ठाणे जिल्हा महामंत्री आणि माजी नगरसेवक संभाजी शिंदे यांनी केला आहे.

## 'विमानतळाच्या हद्दीत मांस विक्री बंद करा'

◆ **नवी मुंबई (वार्ताहर) :**

उलवे परिसरात मांस विक्री आणि प्राण्यांची कत्तल करण्यात येत असल्याची तक्रार पर्यावरण प्रेमींनी मागील महिन्यात केली होती. या तक्रारीची दखल घेऊन नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) विमानतळाच्या हद्दीत होत असलेली मांस विक्री बंद करण्याचे आदेश दिले आहेत. मांस विक्रीमुळे परिसरात कावळे, घारी आदी पक्षी आकर्षित होत असल्याचे पर्यावरणप्रेमींनी तक्रारीत नमूद केले. तसेच विमानविषयक नियमांचे उल्लंघन करण्यात येत असल्याचा दावा करून पर्यावरणप्रेमींनी ही तक्रार केली होती.

कोणत्याही विमानतळाच्या १० किमीच्या परिघात प्राण्यांची कत्तल करू नये असा नियम आहे. तसेच एअरड्रोम पर्यावरण व्यवस्थापन समितीच्या (एईएमसी) नियमावलीतही विमानतळाच्या १० किमीच्या परिघात प्राण्यांची कत्तल करू नये या नियमाचा समावेश आहे. असे असतानाही नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीपासून ३ किमी अंतरावरील उलवे परिसरातील सेक्टर १९ येथे प्राण्यांची कत्तल करून मांस विक्री केली जात आहे. यामुळे नागरी विमान वाहतूकविषयक नियमांचे उल्लंघन होत असल्याचा दावा पर्यावरणप्रेमींनी केला होता. याबाबत पर्यावरणप्रेमी आणि नॅटकनेक्ट फाऊंडेशनच्या बी. एन. कुमार यांनी २४ फेब्रुवारी रोजी नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडे तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेऊन डीजीसीएच्या हवाई सुरक्षा शाखेने मार्च महिन्यात चौकशी सुरू केली होती. ही तक्रार डीजीसीएअंतर्गत एअर सेफ्टी संचालक ए. एक्स. जोसेफ यांच्याकडे पाठवण्यात आली होती.




**कावळे, घार पक्षी आकर्षित**

मांस विक्री केल्यामुळे या परिसरात कावळे, घार यासह विविध पक्षी आकर्षित होतात. त्यामुळे परिसरात दुर्गंधीबरोबरच इतर पक्ष्यांना अधिक धोका निर्माण होऊ शकतो. यामुळे स्वच्छतेचे सर्व नियमही धाब्यावर बसवले जात आहेत.

## काँग्रेसच्या दंतचिकीत्सा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई :** नवी मुंबई जिल्हा काँग्रेसच्या सचिव विद्या भांडेकर यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी कार्यक्रमातून उत्साहात साजरा करण्यात आला. विद्याताई भांडेकर यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाचे नेरूळ सेक्टर दोनमधील काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजन करण्यात आले होते. यावेळी नेरूळ, जुईनगरमधील नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी व मोफत दंत चिकीत्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही शिबिरामध्ये परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये महिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग लक्षणीय होता. दंत चिकित्सा येज कॉंसेपट डेंटल क्लिनिक आणि सेंटर फॉर साईट याचाही यामध्ये समावेश होता. वर्षभर काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून महिलांसाठी समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येत असतात.

## विद्युत रोहित्र चोरीला; कामडीपाडा तहानलेला

◆ **शहापूर (वार्ताहर):**



शहापूर तालुक्यातील मोखावणे-कसारा ग्रामपंचायतमध्ये येणाऱ्या कामडीपाडा आणि धोबीपाडा लोकवस्तीला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीजवळील विद्युत रोहित्र फोडून त्यातील तांब्याच्या तारा चोरट्यांनी पळवून नेल्याने विद्युत पंपाचा वीज पुरवठा खंडित झाला असून १२ दिवसांपासून गावचा पाणीपुरवठा बंद झाला आहे.

यामुळे नागरिकांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. मोखावणे-कसारा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या लोकवस्तीला पाणीपुरवठा करणाऱ्या विद्युत रोहित चोरून घेण्याचे प्रकार सुरूच असतात. या वस्त्यांमधील रोहित्र वर्षातून ४ वेळा चोरीला गेले आहेत. या चोरट्यांचा कायमस्वरूपी बंदस्त होणे गरजेचे आहे.

ऐन तीव्र पाणी टंचाईच्या काळात रोहित्र फोडल्याने नागरिकांना डोक्यावर पाण्याची हंडी भरून पाणी आणावे लागत आहे. येथील नागरिक उन्हाच्या तडाख्यापासून सुरक्षित राहण्यासाठी सकाळ आणि संध्याकाळच्या सुमारास पाणी आणण्यासाठी १ किमीची पायपीट करत आहेत. पाण्याच्या स्रोता ठिकाणी महिलांची पाण्यासाठी झुंबड उडालेली असते. याबाबत वीज वितरण कंपनीने रोहित्र नव्याने बसवत या भागातील पाणी पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी कामडीपाडा आणि धोबीपाडा नागरिक करत आहेत.

> विद्युत रोहित्र चोरी होऊन वीज खंडित झाली आहे. १२ दिवसांपासून पाण्याचा ठणठणाट सुरू झाला आहे. महिलांना १ किमी अंतरावरून पाणी डोक्यावर आणावे लागत असल्याने महिलांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. नागरिकांचा अंत न पाहता महावितरण कंपनीने पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.
> **- सोमा कामडी,** माजी सदस्य, ग्रामपंचायत मोखावणे-कसारा

> वारंवार विद्युत रोहित्र चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने पाणीपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे गावातील मुख्य विद्युत रोहित्रावर पाणीपुरवठा योजनेची जोडणी करून नागरिकांचा पाणी प्रश्न कायमचा मिटविण्याचा प्रयत्न महावितरण कंपनीमार्फत करण्यात येत आहे. जोडणी करण्याकरिता विजेच्या खांब देखील आणण्यात आले आहेत.
> **- शरद वेखंडे,** उपसरपंच, ग्रामपंचायत मोखावणे-कसारा

## ठाण्यातील बंद रेल्वे आरक्षण केंद्र सुरू



◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

सध्या उन्हाळी सुट्टी सुरू झाली असून ठाण्यातील घोडबंदर रोड, मुलुंड आणि ठाणे पश्चिम मधील आसपासच्या नागरिकांच्या सोयीचे आरक्षण केंद्र म्हणून वर्तकनगर आरक्षण केंद्र पाहिले जायचे; परंतु गेल्या एक महिन्याहुन अधिक दिवस हे आरक्षण केंद्र एम. टी. एन. एल आणि रेल्वेच्या वादामुळे बंद पडले होते, आरक्षण केंद्र बंद पडल्यानंतर मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता व ठाणे स्थानकात आरक्षण केंद्रात जावे लागत होते याची तक्रार नागरिकांनी खासदार नरेश म्हस्के यांच्याकडे केली. खासदार म्हस्के यांनी तत्काळ हे आरक्षण केंद्र सुरू करण्याच्या दिशेने पावले उचलली आणि रेल्वे प्रशासन व एम. टी. एन. एल यांच्यात समन्वय साधून हे आरक्षण केंद्र सुरू केले. खासदारकी खाक्या दाखवल्यानंतर हे आरक्षण केंद्र पुन्हा सुरू झाले. या आरक्षण केंद्रास खासदार म्हस्के यांनी भेट दिली.

### उन्हाच्या झळांमधून वन्यजीवांना मिळणार दिलासा

# येऊर जंगलातील बुझलेले नैसर्गिक पाणवठे पुन्हा खुले...

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

तापमान सातत्याने वाढत असून उन्हाची झळ सर्वच जीवांना बसत आहे. माणूस पाण्याच्या शोधात विविध पर्याय वापरतो, पण जंगलातील प्राण्यांसाठी हा पर्याय सहज उपलब्ध नसतो. याच पार्श्वभूमीवर स्वराज्य सामाजिक संस्था, ठाणे आणि जीवोहम ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने येऊरच्या जंगलात बुझून गेलेले पाणवठे पुन्हा सजीव करण्याचा उपक्रम राबवण्यात आला. उपक्रमाचा पहिला टप्पा म्हणून "चिंबीचे पाणी" या नैसर्गिक जलस्त्रोताचा स्वच्छता व उघडणीचा काम हाती घेण्यात आला.



पाणवठ्यांत वर्षभर साचणारी माती, पालापाचोळा, गाळ यामुळे पाणी साठत नाही. परिणामी, उन्हाळ्यात वन्यप्राण्यांना तहान भागविण्यासाठी मानवी वस्त्यांच्या दिशेने जावे लागते. ही स्थिती वन्यप्राण्यांच्या आणि माणसांच्या सुरक्षिततेसाठीही धोकादायक ठरू शकते. सांबर, हरणं, माकडे, वानर, ससे, बिबटे यांसारखे प्राणी पाण्याच्या शोधात जंगलाच्या सीमारेषा ओलांडून मानवी वस्त्यांमध्ये शिरतात. त्यांना त्यांच्या मूळ अधिवासातच आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी जंगलातील नैसर्गिक पाणवठ्यांचे जतन आणि पुनरुज्जीवन आवश्यक आहे. याच उद्देशाने स्वराज्य सामाजिक संस्था व जीवोहम ट्रस्ट यांनी वनविभागाच्या सहकार्याने हा उपक्रम राबवला. श्रमदानाच्या माध्यमातून स्वच्छता करून नैसर्गिक जलस्त्रोत पुन्हा खुले करण्यात आले. या कामात संस्था व ट्रस्टचे कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि प्राणीमित्र यांनी उत्साहाने भाग घेतला.

आरएफओ मयूर सुरवसे यांचे मार्गदर्शन उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपयुक्त ठरले. त्याचबरोबर वनविभागाच्या इतर कर्मचाऱ्यांनीही सहकार्य केले. पुढील टप्प्यात आणखी पाणवठे उघडणार जीवोहम ट्रस्टचे ज्ञानेश्वर शिरसाठ यांनी सांगितले की, "येऊर जंगलात अशा अनेक बुझलेल्या नैसर्गिक पाणवठ्यांची माहिती आम्हाला मिळाली आहे. पावसाळ्यापूर्वी अशा सर्व ठिकाणी श्रमदान करून पाणवठे खुले करण्याचा आमचा मानस आहे." शालेय परीक्षा संपल्यानंतर सुट्टीच्या काळात तीन बाल सदस्यांनीही या श्रमदान उपक्रमात सहभाग घेतला.

## एकनाथ शिंदे क्रिकेट क्लबचा मोठा विजय

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

गोलंदाज आणि फलंदाजांच्या एकत्रित कामगिरीच्या जोरावर एकनाथ शिंदे क्रिकेट क्लब 'ब' संघाने साळगावकर स्पोर्ट्स क्लबचा आठ विकेट्सनी दणदणीत पराभव करत महाराष्ट्र माझा सेवा संस्था आयोजित उपमुख्यमंत्री चषक ठाणे प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत मोठ्या विजयाची नोंद केली.

गोलंदाजांनी साळगावकर स्पोर्ट्स क्लबला १०१ धावांत गुंडाळल्यावर चिन्मय सुतारने नाबाद ७५ धावा करत संघाला २ बाद १०४ धावांसह विजय मिळवून दिला. नाणेफेक जिंकल्यावर प्रथम फलंदाजी करण्याचा कर्णधाराचा निर्णय साळगावकर स्पोर्ट्स क्लबला फायदेशीर ठरला नाही. एकनाथ शिंदे क्रिकेट क्लब 'ब' संघाच्या गोलंदाजांनी नियंत्रित मारा करत प्रतिस्पर्ध्यांच्या फलंदाजांवर अंकुश ठेवला. १६ धावा करणारा कुणकेश पाटील संघासाठी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. प्रणव टिल्लूने १५ धावा बनवल्या. अमित पांडेय, हेमंत बुचडे आणि कर्ष कोठारीने प्रत्येकी दोन बळी मिळवले. या छोट्या आव्हानाचा पाठलाग करताना सलामीला आलेल्या चिन्मय सुतारने २९ चेंडूत १० चौकार आणि चार षटकार ठोकत संघाला विजयाचा मार्ग मोकळा करून दिला. विकी पाटीलने नाबाद ११ धावा केल्या. या डावात प्रणव टिल्लू आणि रोनित रमेशने प्रत्येकी एक बळी मिळवला.



# जातनिहाय जनगणना, एक गेमचेंजर...

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या पर्यटकांच्या हत्याकांडानंतर भारत-पाकिस्तानच्या सरहद्दीवर युद्धाचे ढग जमा झाले आहेत. भारतीय सैन्य दलाकडून पाकव्याप्त काश्मीरमध्ये पुन्हा एकदा सर्जिकल स्ट्राईक होणार की, कठोर निर्बंध लादून भारत सरकार पाकिस्तानची कोंडी करणार असे मंथन चालू आहे. सारा देश पाकिस्तानच्या विरोधात मुठी आवळत असताना केंद्रीय मंत्रिमंडळाच्या राजकीय व्यवहार समितीने आगामी जनगणना करताना देशात जातनिहाय गणना होईल असा मोठा निर्णय जाहीर केला. केंद्र सरकारचा हा निर्णय गेमचेंजर ठरू शकतो. जातनिहाय जनगणनेचे सर्वेक्षण धोरण ठरवताना व निर्णय घेताना सरकारला दिशा दिग्दर्शनासाठी उपयुक्त ठरू शकते. अन्न सुरक्षा, राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम आणि मतदारसंघांचे परिसीमन अशा योजनांची अंमलबजावणी करताना जातनिहाय जनगणनेची आकडेवारी हा मोठा आधार होऊ शकतो. कल्याणकारी योजना आखताना, संशोधन क्षेत्रात आणि आरक्षणाचे धोरण ठरवताना जातनिहाय गणनेची आकडेवारी लक्षात घेऊनच सरकारला निर्णय घ्यावे लागतील.



स्टेटलाइन

डॉ. सुकृत खांडेकर

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या राजकीय व्यवहार समितीचे अध्यक्ष स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल असे दिग्गज या समितीवर आहेत. म्हणूनच या समितीने जातनिहाय जगनगणना करण्याचा घेतलेला निर्णय ऐतिहासिक आहे.


भारतात २०११ नंतर जनगणना झालेली नाही. सन २०२१ मधे जनगणना होणे अपेक्षित होते, पण कोविडच्या संकटाने देश ग्रासल्याने जनगणना होऊ शकली नाही. भारत सरकारने जातनिहाय जनगणना असा आदेश यापूर्वी कधीही दिलेला नव्हता. तत्कालीन केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी तर दि. २० जुलै २०२१ रोजी लोकसभेत एका प्रश्नाला दिलेल्या उत्तरात म्हटले होते की, केंद्र सरकारने अनुसुचित जाती व जनजाती वगळता अन्य कोणत्याही जातीची गणना करण्याचा आदेश दिलेला नाही. जातनिहाय गणना झाली तरच देशात कोणत्या जातीचे किती लोक आहेत हे निश्चित समजू शकेल व सरकारला त्या जातीच्या कल्याणासाठी निश्चित आकडेवारीचा उपयोग होऊ शकेल. जनगणना केल्यावर देशात अनुसुचित जाती जमातीची लोकसंख्या किती आहे हे समजू शकेल.

प्रादेशिक अस्मिता व जातीवर आधारीत व्होट बँक यावर विविध राज्यात प्रादेशिक पक्ष काम करीत आहेत. व्होट बँक राजकारणात आपल्या जाती वा समाजाचे लोक मोठ्या संख्येने आहेत असे दावे त्यांचे नेते नेहमीच करीत असतात. पण जातनिहाय गणनेमुळे कोणत्या जातीची किती लोकसंख्या आहे हे निश्चित समजू शकेल. शिवाय जातीच्या आधारावर केल्या जाणाऱ्या संकुचित राजकारणाला पायबंद बसू शकेल. मंडल आयोगाच्या शिफारसी व्ही. पी. सिंग यांच्या कारकिर्दीत सरकारने स्वीकाल्यानंतर जातीपातीच्या राजकारणाला आणखी वेग आला. आमच्या जातीला व समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे या मागणीसाठी प्रत्येक राज्यात आंदोलने सुरू झाली. आरक्षणातून सरकारी नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत ही भावना दृढ झाली. जातीच्या आधारावर सरकारी नोकरी मिळू शकते व कल्याणकारी योजनांचा लाभ मिळू शकतो असे मागास व उपेक्षित समाजातील लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न झाला. १९९० मध्ये मंडल आयोगाच्या शिफारसी लागू झाल्यावर वेगवेगळ्या जाती-समाजांकडून आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलने सुरू झाली. मंडल आयोगाच्या शिफारसींनंतर देशातील निवडणुकीच्या राजकारणाला वेगळी दिशा मिळाली. भाजपाच्या हिंदुत्वाच्या मुद्याने जातीच्या राजकारणाला शह देण्याचा जरूर प्रयत्न केला पण जातनिहाय गणना झाली, तर हिंदू मतदारांचे



विभाजन होण्याचाही धोका आहे, असेही काहीना वाटते.

गेल्या वर्षी महाराष्ट्र व अन्य काही राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचार सभांमधे पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या भाषणातून एक है तो सेफ है अशा घोषणा देत होते, त्याला लोकांकडूनही जोरदार प्रतिसाद मिळाला. मग जातनिहाय गणना करण्यासाठी मोदी अचानक तयार कसे झाले ? जातनिहाय गणनेपासून दूर राहण्यासाठी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयापुढे आजवर विविध कारणे सांगितली होती. बिहारमधे झालेल्या जातनिहाय गणनेला भाजपाने उघड विरोध केला होता. बिहारचे मुख्यमंत्री नितिश कुमार यांनी पुढाकार घेऊन राज्यात जातनिहाय सर्वेक्षण केले. त्यानंतरही नितिश कुमार एनडीएमध्ये भाजपाबरोबर आहेत. राज्यातील जातनिहाय सर्वेक्षणानंतर बिहारला जाऊन मोदी यांनी नितिश कुमार यांचे जाहीरपणे कौतुक केले. जातनिहाय गणनेचे महत्त्व मोदी सरकारलाही उशीरा का होईल समजले, अशी प्रतिक्रिया विरोधी पक्षातून उमटली आहे. काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या निर्णयाबाबत मोदी सरकारचे अभिनंदन केले आहे. जातनिहाय गणना करायला काँग्रेस व विरोधी पक्षांनी सरकारला भाग पाडले असा प्रचारही सुरू झाला आहे. आता देशात प्रथमच जातनिहाय जनगणना




होणार आहे.

या वर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरमधे बिहारमध्ये विधानसभा निवडणूक अपेक्षित आहे. पुढील वर्षी उत्तर प्रदेशात निवडणूक आहे. निवडणुकीसाठी जातनिहाय गणना हा मुद्दा काँग्रेस-राजद-सपा यांनी जोरदारपणे मांडण्याची रणनिती आखली आहेच... पण मोदी सरकारने स्वतःच निर्णय घेऊन विरोधकांची हवाच फुस्स केली. ज्या काही तीन राज्यांत जातनिहाय गणना झालेली आहे, त्याच्या पारदर्शिकतेबाबत केंद्रीयमंत्री अश्विनी वैष्णव यांनी शंका प्रकट केली आहे. संविधानातील अनुच्छेद २४६ नुसार जातनिहाय गणना करण्याचा अधिकार राज्यांना नसून केवळ केंद्र सरकारलाच आहे.

काँग्रेसने सुरुवातीपासून जातनिहाय गणनेचा कधी पुरस्कार केला असे नव्हे. काँग्रेसने स्वातंत्र्यापासून देशावर सहा दशके सत्ता उपभोगली. पण कधी जातनिहाय गणना केली नाही. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारने सन २०१० मधे जातनिहाय गणनेचे आश्वासन दिले होते. मनमोहन सिंग सरकारने सामाजिक-आर्थिक जातनिहाय गणनेच्या नावाखाली निव्वळ सर्वेक्षण केले. पुढे काही घडले नाही. देशात १९३१ मध्ये जातनिहाय जनगणना झाली होती. याच जातनिहाय जनगणनेच्या आधारावर मंडल आयोगाने १९८० मध्ये आपला अहवाल दिला होता व तत्कालीन पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी १९९१ मधे शिफारसी लागू केल्या. त्यानंतर मागास व उपेक्षित जातीच्या लोकांची संख्या किती आहे, याचे सर्वेक्षण करावे हा मागणी जोर धरू लागली. आता मात्र मोदी सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. भाजपा आरक्षण विरोधी आहे, भाजपा आरक्षण संपुष्टात आणार आहे या विरोधी प्रचाराला मोदींनी जातनिहाय जनगणना करण्याच्या निर्णयातून सडेतोड उत्तर दिले आहे.

जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेऊन मोदी सरकारने विरोधकांची हवाच काढू घेतली. मोदींनी हेडलाइन दिली पण डेडलाईन सांगितली नाही, अशी प्रतिक्रिया काँग्रेसच्या एक ज्येष्ठ नेत्याने दिली. बिहारच्या निवडणुकीत जातगणना हा मुद्दा काँग्रेस व राजद जोरदारपणे मांडू शकेल याची कल्पना भाजपाला आहे. पण त्याची धार आता बोथट झाली आहे. कर्नाटक, बिहार व तेलंगणा या तीन राज्यात जातनिहाय सर्वेक्षण झाले, पण सर्वेक्षणाचा तपशीलच बाहे आलेला नाही. सन २०२१ व २०२३ मध्ये मोदी सरकारने आगामी जनगणनेत जातीचा समावेश करण्याची कोणतीही योजना नाही, असे म्हटले होते. सन २०२१ मध्ये केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयातही हीच भूमिका मांडली होती. केंद्रात युपीए सरकार असताना सन २०११ मध्ये सामाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण केले होते पण त्याचाही तपशील कधी पुढे आला नाह

जाती व समाजाचे नेतृत्व करणारे पुढारी आजही आपल्या समाजाची उन्नती करायची असेल, तर सरकारी नोकरीत व शिक्षणात आरक्षण मिळाले पाहिजे यावर ठाम आहेत. महाराष्ट्रात मराठा, गुजरातमध्ये पाटीदार, राजस्थानमध्ये जाट व आंध्र प्रदेशात कापू यांची आंदोलने थंडावलेली दिसत असली तरी त्या समाजात असंतोष कायम आहे. मोदी सरकारने आर्थिक निकषावर आरक्षण दिले तरी कोणत्या समाजाने आपला आरक्षणाचा हट्ट सोडून दिलेल नाही. काही राज्यांनी ५० टक्के आरक्षाची मर्या ओलांडली असली तरी आमच्यात आणखी कोणाला वाटेकरी आणू नका असे ओबीसी नेते सतत सांगत असतात. जातनिहाय जनगणना कधी होणार हे गुलदस्त्यात आले. काँग्रेस, राज सपा, बसप, राष्ट्रवादी काँग्रेस असा बहुतेक स विरोधकांना जातनिहाय जनगणना हवी आहे. तृणमूल काँग्रेसची भूमिका मात्र सष्ट झालेली नाही. अगोदर भाजपाने जातनिहाय जनगणनेला जोरदार विरोध केला. जातनिहाय गणना म्हणजे देशाचे विभाजन करण्याचा प्रयत्न असा आरोप भाजपाने काँग्रेसवर केला होता. जातनिहाय गण हा निर्णय बिहार व उत्तर प्रदेशच्या निवडणुका डोळ्यांपुढे ठेऊन सरकारने घेतला असावा. मा हा निर्णय केवळ चुनावी जुमला ठरू नये...

sukritforyou@gmail.co
sukrit@prahaar.co.

# मराठीच्या संवर्धनासाठी सोमैयाचा पुढाकार

अभिजात मराठीची चर्चा महाराष्ट्रात सर्वदूर सुरू आहे. जी गोष्ट अभिजात असते ती विशिष्ट संस्कृतीचा मानदंड या नात्याने जपण्याची खूण असते. भाषा ही कोणत्याही म्युझियम-संग्रहालयात काचेच्या कपाटात ठेवण्याची गोष्ट नाही. भाषा ही ती बोलण्याच्या धमन्यांतून प्रवाहीपणे जिवंत राहण्याची गोष्ट आहे. ज्या-ज्या वेळी अभिजात मराठीची चर्चा होते त्या-त्या वेळी ज्ञानभाषा म्हणून तिच्या जडणघडणीचा विचार अत्यंत आवश्यक ठरतो. याकरता विविध विषयांतील-क्षेत्रांतील अद्ययावत ज्ञान मराठीत येणे अत्यंत आवश्यक आहे. राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी एका कार्यक्रमात असे म्हटले होते की, 'ज्ञानाच्या आणि विज्ञानाच्या क्षेत्रातील मूलभूत संशोधन हाती घेण्याचा प्रयत्न ज्या भाषेत होतो तीच भाषा ज्ञानाची भाषा होऊ शकते.' या दृष्टीने शिक्षण क्षेत्राकडे पाहणे अतिशय आवश्यक ठरते.

प्राथमिक शिक्षण हा शिक्षणाचा पाया असून त्याच्यावर माध्यमिक शिक्षणाची आणि महाविद्यालयीन शिक्षणाची इमारत उभी राहते, तर विद्यापीठीय शिक्षण हा सर्वोच्च बिंदू म्हणजे या इमारतीचा कळस होय. महाविद्यालयांमधून विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतलेल्या असंख्य विद्यार्थ्यांना ज्ञानाचा खजिना खुला करून देणे हे विद्यापीठांचे कर्तव्य आहे. इंग्रजी आज जगाची संपर्क भाषा झालेली असली तरी भारतीय भाषांमधून ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठांनी आपली भूमिका बजावणे महत्त्वाचे आहे .



मायभाषा

डॉ. वीणा सानेकर

महाराष्ट्रात विद्यापीठ निर्मिती मंडळाची स्थापना मराठीतून विविध ग्रंथांचे अनुवाद व्हावेत म्हणून झाली होती. ते बंद झाल्यानंतर या आघाडीवर सामसूमच आहे. मराठीविषयी बांधीलकी मानून विविध ग्रंथांचे अनुवाद व्हावेत म्हणून प्रयत्न करणे हे त्या-त्या विद्यापीठाच्या इच्छाशक्तीवर अवलंबून आहे .

गेल्या वर्षभरापासून 'ज्ञानसेतू' हे उल्लेखनीय अभियान सोमैया विद्याविहार विद्यापीठाने हाती घेतले आहे. महाराष्ट्रभरातील जवळपास २५ अनुवादक या अभियानाअंतर्गत जगातील विविध मूलभूत ज्ञानग्रंथांचा मराठी अनुवाद करीत आहेत. आजवर जागतिक प्रतलावरील हे ग्रंथ मराठी अनुवादाची वाट पाहत होते असेच म्हटले पाहिजे.

सोमैया विद्याविहार विद्यापीठ येत्या शैक्षणिक वर्षापासून मराठी विषयातील दोन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी सिद्ध झाले आहे. एम.ए मराठी म्हणजे पदव्युत्तर मराठीच्या अभ्यासक्रमात महाराष्ट्राची जडणघडण, अभिजात मराठीच्या विकासाच्या दिशा, मराठीचे अध्यापन, माहिती तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे आणि मराठी अशा काळाच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. भाषा, साहित्य आणि उपयोजित मराठी यावर लक्ष केंद्रित करून तयार करण्यात आलेला हा अभ्यासक्रम मराठीच्या पारंपरिक अभ्यास क्रमांपेक्षा वेगळा आणि नावीन्यपूर्ण आहे, तर अमराठी भाषकांसाठी संवादी मराठीचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे . महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून ही घोषणा सोमैया विद्यापीठाचे कुलगुरू राजशेखरन पिल्लई यांनी नुकतीच केली. सोमैया शैक्षणिक संकुलात वर्षानुवर्षे भाषा आणि साहित्यसंवर्धनाचे प्रयत्न केले जातात त्यामुळे हातात हात घालून इथे विविध भाषा सुखाने नांदतात.

भाषा आणि साहित्य हा कोणत्याही विद्यापीठाचा आत्मा असतो. माणसाच्या आंतरिक उन्नतीसाठी भाषा आणि साहित्याची दृष्टी विद्यार्थ्यांना मिळाली पाहिजे यासाठी प्रयत्नशील विद्यापीठे जग अधिक सुंदर करतील यात शंका नाही.



# प्रेरणादायी महान क्रिकेटपटू लिसा स्थळेकर

कर्तृत्व हे जन्माने नव्हे, तर कर्माने घडते. हे तिच्या जीवनकहाणीने अधोरेखित होते. ज्या देवकीने तिला जन्म दिला तिने तिला अर्भकावस्थेत रुग्णालयात सोडून दिले. मात्र ज्या यशोदेने तिचा सांभाळ केला तिने तिला विश्वविख्यात क्रिकेटपटू घडवले. ही गोष्ट आहे लिसा स्थळेकर या महान महिला क्रिकेटपटूची.

१३ ऑगस्ट १९७९ रोजी लिसाचा जन्म पुण्यात झाला. लिसाचे डोळे अजून उघडले नव्हते. तेव्हा तिला नियतीच्या क्रूर काळोखात ढकलण्यात आले. नवजात अर्भक असण्याच्या अवस्थेत तिला रुग्णालयात सोडून देण्यात आले. रुग्णालय व्यवस्थापनाने काही दिवस सांभाळले नंतर तिला जवळच्या श्रीवास्तव अनाथाश्रमात ठेवण्यात आले. संस्थेच्या व्यवस्थापकाने तिचे नाव लैला ठेवले. ना आईची माया ना बाबाची छाया. ना मायेची ती कूस ना ममतेची ऊब. या बाळाच्या भविष्यात सटवाईने काय लिहून ठेवलंय हे कोणालाच माहीत नव्हतं. मात्र नियतीच्या मनात काहीतरी वेगळा प्लॅन होता.

लैला तीन आठवड्यांची असताना तिच्या आयुष्यात आणखी एक वळण आले. हरेन आणि स्यू नावाचे एक भारतीय वंशाचे ऑस्ट्रेलियन जोडपे त्यावेळी भारतात आले होते. हे जोडपे एका मुलाला दत्तक घेण्याच्या उद्देशाने भारतात आले होते. त्यांच्या कुटुंबात आधीच एक मुलगी होती, जी दत्तक घेतली होती. त्यामुळे ते या वेळेस एका मुलाला दत्तक घेणार होते. पण पुण्यातील त्या श्रीवास्तव अनाथाश्रमात लैलाच्या चमकदार तपकिरी डोळ्यांनी स्यू मोहित झाली. स्यू लगेचच तिच्याकडे आकर्षित झाली. हरेन




आणि स्यूने लैलाला दत्तक घेतले आणि तिचे नाव लिसा ठेवले. लैलाला लिसा नावाने नवीन नाव, नवीन कुटुंब आणि नवीन आयुष्य मिळाले जणू. लिसा आपल्या या कुटुंबासोबत प्रथम अमेरिकेत आणि नंतर केनियामध्ये राहिली. स्थळेकर कुटुंब शेवटी ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे स्थायिक झाले.



दी लेडी बॉस

अर्चना सोंडे

ऑस्ट्रेलिया म्हटलं की समोर येते ते क्रिकेट. भारतात जर क्रिकेट धर्म असेल, तर ऑस्ट्रेलियात तो एक पंथ आहे असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. या क्रिकेटपंढरीने जगाला क्रिकेटचा खरा डॉन सर डॉन ब्रॅडमन दिला. फिरकीचा जादूगर शेन वॉर्न दिला. ॲलन बॉर्डर, स्टीव्ह वॉ, रिकी पाँटिंगसारखे जगज्जेते याच मातीतले. साहजिकच लिसाला देखील तिच्या वडलांनी क्रिकेटचं बाळकडू पाजलं ते सिडनीमध्येच. सुरुवातीला, तिचे क्रिकेटवरील प्रेम फक्त एक मनोरंजन वाटत होतं. पण त्यावेळी कोणालाही माहिती नव्हतं की हा अंगणातील मनोरंजक खेळ लवकरच एका विश्वविख्यात खेळाडूला जन्म देईल.

फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्हींमध्ये लिसा उत्तम खेळू लागली. ती नैसर्गिकरीत्या प्रतिभावान खेळाडू होती. जेव्हा लिसाने स्थानिक मुलांसोबत क्रिकेट खेळायला सुरुवात केली तेव्हा तिची अष्टपैलू क्रिकेट प्रतिभा लोकांना उमजू लागलं. तिची छबी आसपासच्या भागात निर्माण झाली. क्रिकेटबद्दलची तिची आवड जोपासण्यासोबतच, हरेन आणि स्यू यांनी तिच्या शैक्षणिक कौशल्याकडे दुर्लक्ष होणार नाही याचीही काळजी घेतली.

लिसाचा व्यावसायिक अशा राष्ट्रीय स्तरावर पदार्पण झाले. लिसा १९९७ मध्ये न्यू साऊथ वेल्सकडून स्थानिक क्रिकेट स्पर्धांमध्ये क श्रेणीत खेळू लागली. फेब्रुवारी २००३ मध्ये तिचे कसोटी पदार्पण झाले. २००५ मध्ये तिचा टी-२० संघात समावेश झाला. संघाची आधारस्तंभ ठरत क्रिकेटच्या मैदानावर ऑस्ट्रेलियासाठी ती धमाकेदार कामगिरी करत राहिली. अल्पावधीत तिने एक आक्रमक फलंदाज आणि ऑफस्पिन गोलंदाज म्हणून जागतिक महिला क्रिकेटमध्ये आपला दबदबा निर्माण केला. उत्तम अष्टपैलू खेळाडू म्हणून जगात तिची ओळख निर्माण झाली. तिच्या गौरवशाली कारकिर्दीत, लिसाने खेळाच्या कसोटी, एकदिवसीय आणि ट्वेंटी-ट्वेंटी या तिन्ही स्वरूपात उत्कृष्ट कामगिरी केली. तिने आठ कसोटी सामन्यांमध्ये ४१६ धावा केल्या आणि २३ विकेट्स घेतल्या. १२५ एकदिवसीय सामन्यांमध्ये २७२८ धावा आणि १४६ विकेट्स घेतल्या, तर ५४ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ७६९ धावा आणि ६० विकेट्स घेतल्या.

ऑस्ट्रेलियन महिला संघाने २००५ आणि २०१३ मध्ये एकदिवसीय विश्वचषव तर २०१० आणि २०१२ मध्ये टी-२० विश्वचषक जिंकले. या चार विश्वचषक विजेत्या संघात लिसा महत्त्वाचा घटक होत या चारही स्पर्धेत तिने महत्त्वाचे योगदान दि आहे. दरम्यान लिसाने ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेट संघाचे नेतृत्व देखील केले आहे. ऑस्ट्रेलियाने २०१३ मध्ये महिला विश्वचषक जिंकल्यानंतर दुसऱ्या दिवशी लिसाने निवृत्ती घेतली.

ती एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १००० धावा आणि १०० विकेट घेणारी पहिली महिला खेळाडू ठरली. तिला ऑस्ट्रेलियन क्रिकेट हॉल ऑफ फेममध्ये समाविष्ट करण्यात आले. जेव्हा आयसीसीची रँकिंग प्रणाली सुरू झाली तेव्हा ती जगातील नंबर वन अष्टपैलू खेळाडू होती. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदे (आयसीसी) लिसा स्थळेकरला त्यांच्या हॉ ऑफ फेममध्ये स्थान दिले आहे. लिसा ही बेलिंडा क्लार्क पुरस्काराची दोन वेळा विजे आहे, जो वर्षातील सर्वोत्तम ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटपटूला दिला जातो. या तिच्या कर्तृत्वावरून ती किती महान खेळाडू होती याची खात्री पटते.

अनाथ म्हणून सोडून दिलेलं ते बाळ जगातील सर्वोत्तम क्रिकेटपटू बनते हा लिसाचा क्रिकेट प्रवास थक्क करणारा आहे आयुष्यात आपल्या जवळ काय नाही याचा विचार करत बसण्यापेक्षा जे आहे त्या गुणां वापर करून आपल्या क्षेत्रात सर्वोत्तम व्हा, हा संदेश लिसा स्थळेकरचा जीवनप्रवास आपल्याला देतो. आपण कुठून सुरुवात क यापेक्षा आपण कसे पुढे जातो हे महत्त्वाचे आहे. लिसा स्थळेकर सर्वार्थाने जागतिक महिला क्रिकेटमधील लेडी बॉस आहे.

# दरवाजा

काव्य संमेलनाला जमलेली गर्दी पाहून मन सुखावले होते. आंतरराष्ट्रीय कविता दिनाचा तो दिवस माझ्यासाठी खासचं होता. आपल येणं सार्थकी लागावं, त्यातून ऊर्जा मिळवत, काहीतरी नवीन घडावं, असा काहीसा तो दिवस होता. गमतीचा भाग म्हणजे दर्दी माणसांच्या गर्दीतले बहुतांश चेहरे ओळखीचे असल्याने एकापेक्षा एक दर्जेदार कविता ऐकायला मिळणार हे नक्की होतं. संमेलन सुरू झालं, पुढील कविता सादर करणाऱ्या कवीच्या नावासोबत त्याच्या रचनेचं नाव सांगण्यात आलं. दरम्यान कवीचा साधेपणा त्याच्या कवितेतून झिरपू लागलेला. आता तर दरवाजा विषयीचे गूढ मनात पिंगा घालू लागलेले. हाचं विषय घेऊन, इतर दरवाजांच्या शोधात मी निघाले असता, प्रथम आले अद्वैतापाशी. म्हणजे देवळाच्या प्रमुख द्वारापाशी, जिथं एका पातळीवर भक्त ईश्वराशी गाठ पडते. आंतरिक भावनेने देवत्वाकडे जाताना, गाभाऱ्यातला देव आणि आपल्यात असतो ओथंबून वाहणारा एक भक्तीरस दरवाजा. देवळाचे दरवाजे एका ठराविक वेळी बंद झाले तरी, एक आश्वस्थ, चिरंजीवी हात आपल्या पाठीशी कायम असतो.



मोरपीस

पूजा काळे

पुढे आलेले गड किल्ले. जे माझ्या मराठी मुलुखाचे श्रद्धास्थान आहेत. याच्या भक्कम तटबंदी, बुरूजापुढे मी नतमस्तक होते. किल्ल्यावरील एक एक दरवाजा इतिहासाची साक्ष देतो. गड किल्ल्यांच्या दरवाज्याची भाषा म्हंटली तर रांगडेपणाची. ज्यामध्ये अजातशत्रू, संकटाचं वारं पळवून लावण्याचं सामर्थ्य आहे. लाखोंचे बळ या दरवाजापाशी असल्याने यापुढे तलवारी म्यान टाकतात. शत्रू माघार घेतो. त्याला परतवून लावण्याची जबर शक्ती या दरवाजात आहे. अशा या कणखर, बुलंद महाराष्ट्राची प्रतिमा चाळवजा संस्कृतीत घराघरांत जोपासली जाते. दहा बाय दहा चाळसंस्कृतीच्या दरवाज्यात डोकावताचं लोखंडी कडीकुलपं मला खुणावू लागतात. ही खूण खुपशी ओळखीची तसचं आपलीशी असणारी. दिवसा उजेडी कदापी बंद नसलेले, आगंतुकाला आपलसं करणारे, चाळीचे सताड आणि उघडे दरवाजे माणसाच्या चांगुलपणाची साक्ष देतात. माणुसकी सांभाळणारे, अभावानेचं दिसणारे हे दरवाजे आता पाहावयासं दुर्मीळचं. कारण साहित्य संस्कृतीची शोभा वाढवणारे, चाळीतील दरवाजे गगनचुंबी पहाऱ्यात बंदिस्त झालेले पाहिले की, आपणचं आपल्याला घातलेल्या मर्यादेच्या जाणिवा चिरून टाकतात. इमारतीचे बंद दरवाजे कोतेपणाची भावना तीव्र करतात. आम्ही नसे कोणाचे आम्ही आमचे राजे म्हणत, संपुष्टात येत असलेली अमानवी मुळं इथं उगवतात. त्या उलट भावकीची वाट पाहणारे गाव-खेड्यातील कमनीय, नक्षीदार दरवाजे सागवानी लाकडाच्या गुणधर्मासारखे मजबूत, तटस्थ आणि वाटेकडे डोळे लावून बसलेले दिसतात.

जिथं वस्ती तिथं दरवाजा. म्हणजे बघा, सतत कामाच्या ओझ्यानं दबलेला. एक ते पाच वेळेतला कामकाजाच्या ठिकाणी ऊघडणारा दरवाजा कमी अधिक प्रमाणात उन्नतीच्या मार्गाने येणाऱ्या रस्त्यांना जाऊन मिळतो. इथं तुमची ओळख पंचिंग मशिन ठरवते. शासकीय यंत्रणाही यातून सुटत नाही. यांच वैशिष्ट्य म्हणजे बिनओळखीच्या



माणसांचे स्वागत करण्यास हे दरवाजे पुढे असतात. टेबलाखालून, टेबलावरून दिल्या-घेतल्याशिवाय, एखादं आत्मदहन, एखादी विपरीत घटना, मोर्चे, संप, आंदोलन घडल्याशिवाय ते सहसा उघडत नाहीत, यांना जाग येत नाही, एवढा गंज यांच्या कडीला लागलेला असतो. असं म्हणतात की, पोलिस स्टेशन आणि कोर्ट यांचे दरवाजे ठोठावू नयेत. किंवा तिथपर्यंत जाऊ नये, पण चित्र त्या विरुद्ध भासत. आजकाल कोर्टाची पायरी सामान्य माणसांच्या नव्हे तर, उच्चभ्रूंच्या चप्पलबुटांच्या चिखलाने माखलेली दिसते. न्याय मिळेलचं याचीही शाश्वती नाही. हीचं गोष्ट इथल्या इस्पितळांची. दरवाजातून लक्ष्मी आत येते, पण परतावा म्हणून दरिद्री नारायणाला यमदूताचे रौद्र रूप दाखवते. ऑक्सिजन विरहित आरोग्याचे तीन तेरा वाजवणारे इस्पितळातले मृतवत दरवाजे फारसे आनंददायी नसतात, हे आपण जाणतो. दरवाजा आवर्तनातल्या छोट्या, मोठ्या तारक, मारक परिणामकारक पायऱ्यांचा अनुभव बऱ्याचं जणांच्या गाठीशी आहे. तो पार करण्यातली भिस्त, घबराट, आनंद, दुख, नैराश्य प्रत्येकाजवळ आहे. प्रत्येक दरवाज्याच्या भूमिका वेगवेगळ्या असल्या तरी, दारोदारची शिकवण वेगळी असते. विटा, रेती, माती, दगड, पाषाण, लोखंड, लाकूड यापासून बनलेली दारं वेगळी असली तरी चार भिंतीतल्या चार माणसांमध्ये समन्वय राखण्याचं काम ती करतात. तेव्हाची स्थिती ही अशी असते.. चार भिंतीं अन् खुले दरवाजे, स्वप्न पाहिले मी घेत ऊसासे.. मजली मजली चढवित जाता, घर संगमरवरी ताजचं भासे.|


मी पुढे होत असताना, ओळखीच्या वळणावर ज्ञानसंवर्धनासाठी असलेला एक दरवाजा शाळेचा रस्ता दाखवतो, जो पिढ्या घडवतो. उत्तुंग, भव्य विचारांची पेरणी करतो. कॉलेज लायब्ररीत ज्ञानाचे दीप प्रज्वलित करतो. कधीकधी तर व्यसनमुक्तीचे दरवाजे जीव तोडून मुक्त होण्यासाठीची धडपड करतात. त्यांच ऐकायला हवं. पण ऐकत कोण.? लालवस्तीत पडद्यामागच्या दरवाज्यात निष्पाप जीव कलंकित वलयात धूसर होत जातात. तिथल्या दरवाज्याआड आकांतातला आतला आवाज सहसा कुणाला ऐकू येत नाही. उंबरठा या माझ्या कवितेतून मला हेच सुचवायचंय...

क्षतिग्रस्त चौकटीचा उंबरठा ओलांडून,
सिद्ध करावे स्वतःला
ओळखून पारखून...|
वेशीवर उभा असतोच दूषणाचा बाप,
तिच्या हरकतीवर सगे काढतात माप... |
उरी जपण्या लाजेस घेते दमानं उश्वास,
चारित्र्याच्या कुपीमध्ये
बंद कोंडलेला असतो तीचा श्वास.. |
उंबरठा झिजेपरी असे भिंतीला आधार,
चौकटीला वाळवीची
नशा लागे अंती फार... |
जात असते बाईची शांत संयमी कठोर,
उंबराचं असतो दिमतीला सोसण्यास भार...

अशावेळी आपलं धोरण कस असावं तर असं असाव, अन्यत्र एकही दरवाजा आपल्यासाठी नसेल.' रोज होते माणसांची ये-जा ये-जा, दरवाजा पाहतोय मजा मजा | दरवाज्या आत अतिरिक्त चळवळी, बाहेर वाढते विचारांची रणधुमाळी | मेंदूवर चढतोय गाळचं गाळ, ए...माणसा तू तुझं दप्तर सांभाळ|"

विविधांगी रंगीन कमानीचे दरवाजे नान दिशा दाखवतात. यातला एक दरवाजा जात स्वप्नांकडे आणि उघडतो ध्येयपूर्तीजवळ जो मानव केंद्रित असतो. मनाने घेतलेली पकड आव्हान झेलण्यास मजल मारू लाग की, समजावं प्रकाशाचे दरवाजे उघडत आहेत. दुखाच्या परडीत सुखाची तिळमात्र सुगंधीत फुले नाचू लागली की, ओळखावं आतला आवाज दरवाजाच्या वाटेवर सक्षम विटा रचू लागलाय. आतबाहेर ऊघडणारी दारं, शिड उभारलेल्या गलबतासारखी साथ देणारी दारं घराला घरपण देतात. सातच्या आत घराला शिस्त आणतात. या दारातून मार्गक्रमण म्हणजे एक पाऊल प्रगतीकडे. यशोउन्नतीसाठीचा प्रवास सगळ्यांच्या आयुष्यात असतो. नकळत पावल घराकडे वळतात. आता गोकुळात माझीचं उणीव असते. मी दरवाजा ठोकावतो. सुहास्यवदन आई, बायको, मुली, मुलं दरवाजा उघडता आनंदाचं शिंपण करत, खळाळतं हसत अर घर. मनस्वास्थ्यासाठी, असिम शांततेच्या शोधात चौकटी आत प्रवेश करतो मी. लगोलग खुला दरवाजा विश्वासाने बंद होत दुसरा दिवस पाहण्यासाठी, उघडण्यासाठी.

महान संगीतकार श्रीनिवास खळे यांचा जन्म ३० एप्रिल १९२६ चा. ३० एप्रिलपासून त्यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले, त्या निमित्ताने...



# तो राजहंस एक...!

विशेष
**अभय गोखले**

महान संगीतकार श्रीनिवास खळे यांचा जन्म ३० एप्रिल १९२६ चा. ३० एप्रिलपासून त्यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होते, त्या निमित्ताने हा लेखनप्रपंच. एक अष्टपैलू संगीतकार अशी ओळख असलेले श्रीनिवास खळे हे मराठी संगीत क्षेत्राला लाभलेले एक वरदान होते, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

भक्तिगीत, बडबड गीत, बालगीत, भावगीत, चित्रपट, संगीत, पोवाडा, लावणी आणि नाट्यसंगीत या संगीतातील सर्वच क्षेत्रांत संचार करणारे श्रीनिवास खळे हे बहुदा मराठी संगीत क्षेत्रातील एकमेव संगीतकार असावेत. महाराष्ट्राचे राज्यगीत "जय जय महाराष्ट्र माझा'' या गीताला श्रीनिवास खळे यांनी चाल लावली आहे, ही गोष्ट आजच्या पिढीतील बऱ्याच जणांना कदाचित माहीत नसेल.

वसंत प्रभू, वसंत देसाई, वसंत पवार, राम कदम, सुधीर फडके आणि दत्ता डावजेकर या समकालीन संगीतकारांच्या स्पर्धेत श्रीनिवास खळे हे नुसते टिकलेच नाहीत, तर त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली.

सुरुवातीला ते आकाशवाणीवर व नंतर एचएमव्ही या रेकॉर्ड कंपनीत नोकरीला असल्यामुळे महाकवी ग. दि. माडगुळकर, सुधीर फडके यांच्यासारख्या दिग्गजांचा त्यांना सहवास लाभला. लता मंगेशकर, आशा भोसले, हृदयनाथ मंगेशकर, सुमन कल्याणपूर, पं. भीमसेन जोशी, सुरेश वाडकर, अरुण दाते यांच्यासारख्या दिग्गजांनी खळे यांनी बांधलेल्या चाली गायल्या आहेत.

भावगीत, सुगम संगीत आणि बालगीत या बाबतीत तर खळे यांचा हातखंडा होता. "उतरली सांज ही धरेवरी'' (सुमन कल्याणपूर), कशी ही लाज गडे मुलुखाची',(मालती पांडे), जादू अशी घडे ही,' (अरुण दाते-सुमन कल्याणपूर), कशी रे तुला भेटू' (मालती पांडे), तू अबोल होऊनी, (सुमन कल्याणपूर), शुक्र तारा मंद वारा' (अरुण दाते-सुधा मल्होत्रा) यांसारखी खळे यांनी संगीतबद्ध केलेली गाणी त्यांना प्रचंड लोकप्रियता देऊन गेली.

अभंगवाणी या प्रकारात खळे यांनी पंडित भीमसेन जोशी यांच्याकडून गाऊन घेतलेले, 'विठ्ठल गीती गावा, पंढरीचा वास, राजस सुकुमार, सावळे सुंदर रूप मनोहर, जे का रंजले गांजले, हे अभंग अजरामर झाले आहेत. सुंदर ते ध्यान उभे विटेवरी, हा लता मंगेशकर यांच्या गोड गळ्यातील अभंग, खळे हे किती अप्रतिम चाल लावत असत यांची साक्ष देणारा आहे.

'या चिमण्यांनो परत फिरा रे' हे 'जिव्हाळा' या चित्रपटातील लता मंगेशकर यांनी गायलेले गाणे हा खळे यांच्या संगीत कारकीर्दीतील सर्वोच्च बिंदू मानावा लागेल. या गाण्याची हकीकत अशी आहे की, जिव्हाळा हा चित्रपट गुरूदत्त प्रोडक्शनचा होता. या चित्रपटाचा निर्माता होता, गुरूदत्त यांचा भाऊ आत्माराम. या चिमण्यांनो... या गाण्याची चाल लता मंगेशकर यांना समोर ठेवून खळे यांनी बांधली होती. मात्र लता मंगेशकर यांना वेळ नसल्याने ते गाणे दुसऱ्या कुणाकडून तरी गाऊन घ्यावे, असे लता मंगेशकर यांनी खळे यांना सुचवले होते; परंतु हे गाणे मी लता मंगेशकर यांच्यासाठीच बांधले आहे, तेव्हा त्याच ते गातील असा आग्रह खळे यांनी धरला होता. अखेर खळे यांनी थेट लतादीदींना सांगितले की, हे गाणे तुम्हीच गावे अशी माझी फार इच्छा आहे. यावर लतादीदींनी आपली डायरी बघितली आणि सांगितले की, दीड महिना तरी आपल्याला वेळ नाही. इकडे जिव्हाळा चित्रपटाचा निर्माता आत्माराम याला चित्रपट रिलीज करण्याची घाई झाली होती.

शेवटचा उपाय म्हणून खळे यांनी गाण्याची चाल ऐकण्याची गळ लतादीदींना घातली व त्यांनीही ते मान्य केले. चाल ऐकल्यानंतर त्यांना ती इतकी आवडली की त्या म्हणाल्या, मी माझ्या कार्यक्रमात कितीही व्यस्त असले तरी हे गाणे मीच गाणार आहे.



नंतर त्यांनी ते गाणे गायले आणि आपण खळे यांना नकार दिला असता, तर मोठी संधी गमावली असती, याची जाणीव त्यांना झाली. गाणे गाऊन झाल्यानंतर लतादीदी स्टुडिओतून बाहेर पडत असताना, आत्मारामच्या सहाय्यकाने खळे यांना विचारले की, मानधनाचे काय? खळे म्हणाले ते तुम्हीच बघून घ्या. मग त्याने शक्य तेवढे पैसे पाकिटात भरले व ते पाकीट तो लतादीदींना देऊ लागला, त्यावर दीदी म्हणाल्या कसले पैसे? मी तुमच्यासाठी नव्हे तर खळ्यांकरिता गायले, मी मानधन घेणार नाही. खळे यांचे हे गाणे इतके अप्रतिम होते की ते गायल्यानेच माझे मानधन मला मिळाले आहे.

१९५१ साली 'लक्ष्मीपूजन' या चित्रपटाला खळे यांनी पहिल्यांदा संगीत दिले. या चित्रपटाचे निर्माते होते, शरद पोतनीस. पोतनीस यांनी असा आग्रह धरला की चित्रपटाला संगीत खळे हेच देतील; परंतु या चित्रपटाचे गीतकार ग. दि. माडगूळकर यांचा त्याला विरोध होता. त्यावेळी खळे हे चित्रपट क्षेत्रात नवीन असल्याने गदिमांनी विरोध केला असावा. माडगुळकर हटूनच बसले की चित्रपटाला संगीत, सुधीर फडके हेच देतील, नाहीतर मी गाणी लिहिणार नाही. पोतनीस यांनी गदिमांना सांगून बघितले की, तुम्ही प्रथम खळे यांनी चाल लावलेली गाणी ऐका आणि नंतरच काय ते ठरवा; परंतु गदिमा आपला हेका सोडायला तयार होईनात.

पोतनीसही मग हटून बसले. ते म्हणाले गदिमांचा विरोध असेल, तर आपण शांता शेळके यांच्याकडून गाणी लिहून घेऊ. शेवटी हो ना करता करता गदिमा, खळे यांनी बांधलेल्या चाली ऐकण्यास तयार झाले. त्यातील 'गोरी गोरी पान' आणि 'एका तळ्यात होती' या गदिमांच्या गाण्यांना खळे यांनी इतक्या अप्रतिम चाली लावल्या होत्या की, त्या ऐकून गदिमा थक्कच झाले. त्यांनी आनंदाने खळे यांना मिठीच मारली. आता खळे हेच या चित्रपटाला संगीत देतील असा आग्रह त्यांनी धरला.

खळे यांची तारीफ करताना सुप्रसिद्ध संगीतकार नौशाद यांनी एके ठिकाणी असे म्हटले होते की, खळे यांनी जी गाणी स्वरबद्ध केली आहेत, ऐसे गीत मै जिंदगी सचमे नहीं बना सका! खळे यांचा शागीर्द बनण्यात मला धन्यता वाटेल, असे गौरवोद्गारही नौशाद यांनी त्यावेळी काढले होते.





कोलाज

रविवार, ४ मे २०२५

# भावंडांची भांडणं



आनंदी पालकत्व
**डॉ. स्वाती गानू**



आपण पाहत असतो की आत्ता तर दोघं भावंडं छान खेळत होती, त्यांचा आवडता टीव्ही. शो आनंदाने पाहत होती. मनातल्या मनात तुम्ही म्हणत असता की "चला आजचा दिवस शांततेत गेला" आणि अचानक पुढच्या क्षणी तुम्हाला आरडाओरडा करण्याचा आवाज येतो. भावंडं आपापसात भांडायला लागलेली असतात. कदाचित मारामारीही सुरू झालेली असते. त्या दोघांच्या भांडणात हस्तक्षेप करू नये किंवा त्यांनी त्यांचं भांडण स्वतः सोडवावे असे तुमच्या मनात येते. पण तो विचार तुमच्या मनाला पटत नाही योग्य वाटत नाही. पण एक गोष्ट लक्षात घ्या की, मुलांच्या भांडणात आपण हस्तक्षेप करणं किंवा त्यांना त्यांची भांडणं स्वतः सोडवून देणे या दोन्हीपैकी कोणत्याही एका पर्यायाला चिकटून राहणे योग्य नाही. जर तुम्ही त्यांची भांडणं सोडवायला लागलात, तर मुलं आपले प्रॉब्लेम्स स्वतः सोडवू शकणार नाहीत. प्रश्न कसे सोडवावे हे ते कधी शिकू शकणार नाहीत आणि जर तुम्ही मुलांच्या भांडणात हस्तक्षेप न करता लांब राहिलात, तर दोनपैकी एक भावंड परिस्थितीचा फायदा घेऊन दुसऱ्याला त्रास देईल. म्हणून या दोन्ही पर्यायाचा समतोल साधणं हीच भावंडांमधील भांडणं सोडवण्याची गुरुकिल्ली आहे. पण हे प्रभावीपणे करायचं तरी कसे?

**...तर आधी समजून घेऊया की भावंडांमध्ये भांडणं का होतात?**

भावंडांमधील भांडणं ही तर एक नैसर्गिक बाब आहे. भांडणाला कारण थोडंच लागतं. कोणत्याही गोष्टींसाठी ते भांडू शकतात. सगळ्यात मोठे कारण असते ते म्हणजे भावंडांमध्ये सारखी स्पर्धा सुरू असते. अभ्यास, कपडे, खाणं, खेळ. खरं म्हणजे कोणत्याही गोष्टीवरून ते भांडू शकतात. अगदी आई-वडिलांचे लक्ष वेधून घेण्यासाठी ही मुलं भावंडांशी भांडतात. अशावेळी आपला तोल सुटू शकतो आणि मग त्या रागात आपण मुलांशी नीट वागत नाही.

या भांडणांकडे बघण्याचा एक मजेदार अँगल हाही आहे की, मुलं जेव्हा भांडतात तेव्हा वाद घालतात, बोलण्यातून एकमेकांवर कुरघोडी करतात त्यातून त्यांचं भाषेवरच प्रभुत्व वाढतं, ते आपले मुद्दे प्रभावीपणे मांडतात आणि दुसऱ्यांचे न पटणारे मुद्दे खोडून ही काढू शकतात. असं असलं तरी मुलांनी भांडू नये. एकमेकांचा दुस्वास करू नये. वादविवाद, भांडणांमुळे मुलांच्या नात्यात कटुता येऊ नये. घरातील वातावरण अशांत होऊ नये अशीच प्रत्येक पालकाची अपेक्षा असते म्हणूनच आपल्या मुलांना आपापसातील, भावंडांमधील भांडणं कशी सोडवावी हे शिकवायलाच हवं.

**मुलांची भांडणं कशी सांभाळायची, हॅन्डल कशी करायची ते आता पाहू या.**

१. भांडणांचं नेमकं मूळ जाणून घ्या.

२. दरवेळेस मुलं वस्तू, मिळणाऱ्या सुखसोयी यावरूनच भांडत असतात नाहीतर बहुतेक वेळेला त्यांचा जन्मक्रम आणि फॅमिली डायनॅमिक्स ही कारणंही असू शकतात.

३. कुटुंबात पहिल्यांदा जन्माला आलेल्या मुलाचे लाड जास्त होतात. त्याला पालकांकडून जास्त सुविधा, सुरक्षितता, कौतुक मिळतं.

४. मुलांच्या भांडणाचे मूळ आपापसातील स्पर्धा असली तरी प्रत्येकवेळी स्पर्धा नकारात्मक नसते. मात्र भावंडांच्या बाबतीत त्यांचे एकमेकांशी असलेले नाते खराब होऊ शकते. असे का? कारण जर ती तुलना फार काळ चालत राहिली, तर त्याचा परिणाम वाईट होईल.

५. मोठ्या माणसांत जर शत्रुत्व असेल, तर त्याचाही परिणाम मुलांवर होत असतो .

६. पालकांनो, भावंडांत भांडणं होतात तेव्हा शांत राहा, डोकंही शांत ठेवा. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी हे आवश्यक आहे. मुलं काय करताहेत यावर लक्ष ठेवल्याने परिस्थिती हाताबाहेर जाणार नाही. तुम्ही शांतपणे भांडणं हाताळता हे पाहून मुलंही अगदी तशीच वागतील.



७. घरात सगळ्यांनी एकमेकांना मदत करावी, परस्पर सहकार्य करावे असे वातावरण ठेवा.

८. मुलांची तुलना करणे टाळा, एकापेक्षा दुसऱ्याला जास्त फेवर करू नका. याउलट त्यांनी एकत्र खेळणे, एकमेकांबरोबर वेळ घालवणे या गोष्टीला प्रोत्साहन द्या.

९. आपले पालक एकमेकांशी कसं वागतात याचं उदाहरण मुलांसाठी आदर्श म्हणून जर तुम्ही घालून दिलतं तर मुलंही त्यातून शिकतात.

१०. तुम्ही दार आपटणं, आरडाओरडा करणं हे जर मुलांनी पाहिलं तर मुलंही भांडण सोडवताना याच मार्गाचा वापर करतील.

११. मुलांबरोबर जास्तीतजास्त वेळ घालवा आणि त्यांना समजावून सांगा की भांडणं झाली तर थोडा वेळ पॉज घ्यायचा असतो म्हणजे तुम्ही शांत व्हाल आणि भांडणं सोडवता येतील .

१२. कुटुंबातील सगळेजण एकत्र बसून बेसिक नियम ठरवून घ्या. कोणीही कुणाचे मन दुखावेल असे शब्द वापरायचे नाहीत. समोरचा बोलत असताना मधेमधे बोलायचे नाही. आरडाओरडा नकोच. आपण सुजाण नागरिक आहोत हे मुलांना समजावून सांगा.

१३. प्रत्येकाला बोलण्याची, आपलं म्हणणं मांडण्याची संधी द्या. मुलांना घडलेल्या प्रसंगाबद्दलचा स्वतःचा दृष्टिकोन मांडू द्या. त्यांना काय वाटतं ? मुलांना त्या प्रॉब्लेमना नाव देऊ दे. विचार करू दे. जेणेकरून त्यांची ऐकून घेण्याची क्षमता विकसित होईल.

१४. एकदा का मुलांना प्रॉब्लेम कळला की, त्यांना उपाय शोधण्यासाठी विचार करता येईल. यासाठी ते ब्रेनस्ट्रॉर्म करतील. हे लगेच होत नाही पण मुलांना संधी दिली की, त्यांना स्वतःचे प्रश्न सोडवता येतील. मग आपण असहाय्य आहोत, आपल्याकडे समोरच्याशी सामना करण्याची ताकद नाही ही अधिकारहीनतेची भावना त्यांच्यातून कमी होईल.

१५. आपली चूक झाली असेल तर माफी कशी मागावी?. चूक कबूल कशी करावी? हे मुलांना शिकवा. जेव्हा मुलं चुकतात तेव्हा ती चूक मान्य कशी करायची यासाठी मुलांना मदत करा. म्हणजे नंतर भांडणादरम्यान होणारा वाद-विवाद टाळता येईल. एकदा का चूक कळली, ती मान्य करता आली तर तमाशे होत नाहीत.

मुलांना त्यांच्या चुकांची जबाबदारी घ्यायला शिकवली की आक्रमकता, मारामाऱ्या टाळता येतील आणि मुलांना भांडणाचे मूळ कारण कळेल.

आपली चूक कबूल करण्याचे महत्त्व मुलांना शिकवण्याचा सगळ्यात महत्त्वाचा मार्ग म्हणजे क्षमा मागणे, 'सॉरी' म्हणणे हाच आहे.

पालकांनो मुलांना सांगा की,
"Brothers and Sisters are like sugar and spice, they may fight but they always make life sweet."

# उद्योगपती भाऊसाहेब केळकर

कोकण आयकॉन
**सतीश पाटणकर**



झवेरी बाजार, क्रॉफर्ड मार्केट या परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून कुणीही रसिक चांगल्या दर्जेदार अत्तराच्या शोधात गेला की, अत्तरवाले त्यांचा रुमाल सुगंधी करून सोडतात आणि ग्राहकाची पसंतीची दाद मिळाली की सांगतात, 'केल्करका है, असली'. परफ्युमरीच्या उद्योगात फ्रान्सपासून इजिप्तपर्यंत कोणत्याही देशांची कितीही नावे घेतली गेली, तरी केळकरांच्या अत्तराला तोड नाही, हे कोणीही मान्य करील. अत्तरवाले केळकर याच नावाने सर्व घरांमध्ये परिचित झालेले उद्योगपती भाऊसाहेब केळकर यांच्या महतीचा दरवळ हा असा कायम राहिला आहे.

भाऊसाहेबांच्या वडिलांनी भावासह १९२२ साली अत्तर निर्मितीसाठी एस. एच. केळकर कंपनीची स्थापना केली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हा उद्योग आणखी बहरेल, हे लक्षात घेऊन त्यांनी मुलुंडमध्ये ३५ एकरची जागा खरेदी केली होती. भाऊसाहेबांनी सेन्ट झेवियर्समधून भूगर्भ विज्ञानाची पदवी घेतल्यानंतर या उद्योगाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. पण केवळ वडिलोपार्जित संचितावर कारभाराचा गाडा न हाकता सुगंधी द्रव्याच्या क्षेत्रात परिश्रमपूर्वक संशोधन त्यांनी सुरू केले. परफ्युमरी आणि कॉस्मेटिक्स या क्षेत्रात फ्रान्स, इटलीसारखे देश तेव्हाही आघाडीवर होते. त्यामुळेच जगात लोकप्रिय होतील, अशी अत्तरे तयार करायची, तर कच्च्या मालावर ज्याला बेस म्हणतात ती द्रव्ये तयार करण्यावर अपूर्व असे संशोधन गरजेचे होते. भाऊसाहेबांनी त्यात लक्षणीय यश मिळविल्यामुळेच आज त्यांच्या अत्तरांची ५० पेक्षा जास्त देशांमध्ये निर्यात होते आणि हा उद्योग दीडशे कोटींचा टप्पा पार करून गेला आहे. इतकेच नव्हे, तर कित्येकांना ठाऊक नसलेल्या उत्पादनांमध्येही केळकर कंपनीची अत्तरे, इसेन्स यांचा बेस उपयोगास येतो. मग ती एखादी साबणाची पावडर किंवा वडी असो, अगरबत्ती असो, परफ्युम-डिओडरन्ट असो, नाहीतर थंडगार आइसक्रीम. फॅन्टासिया, फसली गुलाब, चंदनॉल, हिना यासारख्या सभा-समारंभांचे मांगल्य वाढविणाऱ्या अत्तरांची नावे सर्वांना पाठ झाली.



परदेशी आयातीवर अवलंबून न राहता भारतात उपलब्ध असलेल्या वनस्पतींचा वापर करण्याचे संशोधन त्यांनी केले. केळकर उद्योगाची सुगंधी द्रव्ये काळाच्या महिम्यातही अशीच टिकून राहिली, कुटुंबप्रणीत उद्योगांच्या परंपरेत यशस्वी ठरलेली घराणी अगणित आहेत; परंतु सुगंध निर्मितीसोबतच सामाजिक ऋण फेडणारं वझे-केळकरांसारखे कुटुंब आणि त्यांची कथी विरळच आहे...

देश पातळीवर टाटा, बिर्ला, अंबानी असे मोठे उद्योग हे कुटुंबप्रणीत उद्योग आहेत. महाराष्ट्रातही किर्लोस्कर, बजाज, गरवारे अशी उद्योजक घराणी प्रसिद्ध आहेत. या सगळ्या कुटुंबप्रणीत उद्योगांमध्ये आजही अग्रणी आहे ते वझे-केळकर कुटुंब. एस. एच. केळकर आणि कंपनी लिमिटेड या नावाने प्रसिद्ध असलेल्या या उद्योगसमूहाची मालकी केळकर कुटुंबीयांकडे आहे. १८० कोटी रु. हून अधिक उलाढाल आणि पाचशे कोटी रु. हून अधिक मूल्य असलेला हा उद्योग कुणाच्याही सहयोगाशिवाय एका कुटुंबाने चालवला आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात सदाशिव आणि दामोदर हे बंधू कोकणातल्या देवगड जवळच्या लहानशा खेड्यातून शिक्षणासाठी म्हणून बहीण सरस्वतीबाई वझे यांच्याकडे सांगलीला आले. नट म्हणून सांगली परिसरात प्रसिद्ध असलेले मेहुणे गोविंद वझे यांच्या अत्तराच्या जोडव्यवसायात दोघे भाऊ मदत करू लागले. त्या काळी बीएस्सीपर्यंत शिकलेल्या या बंधूंनी केवळ अत्तर विक्री न करता, अत्तरनिर्मितीचे तंत्रही शिकून घेतले. सरस्वती केमिकल वर्क्स या नावाने हेअर ऑइलसारख्या सौंदर्य प्रसाधनांचे उत्पादन सुरू केले. अशातच मेहुणे गणेशराव वझे यांचे अकस्मात निधन झाले. आता दोघा भावांनी मिळून व्यवसाय पुढे न्यायचा असे ठरवले.

धंद्याच्या वाढीबरोबर केळकर कुटुंबाने सांगलीहून मुंबईला स्थलांतर केले. १९२२ मध्ये गिरगावात अत्तराच्या किरकोळ विक्रीचे दुकान त्यांनी सुरू केले आणि त्याच वर्षी एस. एच. केळकर आणि कंपनीची स्थापना झाली. त्या काळात दसरा, दिवाळीच्या मोसमात दुकानाबाहेर रांग लावून लोक अत्तराची खरेदी करत. याशिवाय, सदाशिवराव तथा दादासाहेब हिंदी चित्रपटांना अर्थसहाय्यही करत. व्ही. शांतारामांचा राजकमल स्टुडिओ आणि त्यांच्या पहिल्या तीन चित्रपटांना सदाशिवरावांनी अर्थसहाय्य केले होते.

पुढे १९३३ मध्ये सरस्वतीबाई गंभीर आजारी पडल्या. त्यावेळी त्यांनी आपल्या धाकट्या भावाला म्हणजे दामोदर केळकर यांना दत्तक घेतले आणि त्यांचे विनायक गणेश वझे असे नामकरण केले. सदाशिव केळकर आणि विनायक वझे हे दोघे सख्खे भाऊ आणि केळकर-वझे हे खरे तर एकच कुटुंब. त्याकाळी दादरला वास्तव्य करणाऱ्या या कुटुंबाला दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील बिकट परिस्थितीमुळे एक वर्षभर सांगलीला जाऊन राहावे लागले. मुंबई इलाख्यात सरकारच्या कर आकारणीचे प्रमाण जाचक होते (नफ्याच्या ९० टक्के भाग सपर प्रॉफिट कर म्हणन द्यावा लागे.) त्याला कंटाळून थोरले बंधू सदाशिवरावांनी स्वतःच्या मालकीचा धंदा विकून म्हैसूर प्रांतात स्थलांतर केले. अत्तरासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या उत्पादनाचे एक छोटे युनिट त्यांनी बंगळूरुला सुरू केले. काही काळानंतर ते परत महाराष्ट्रात आले आणि पुण्याला स्थायिक झाले. पुण्यातील प्रभात स्टुडिओची जागा त्यांनी विकत घेतली; परंतु शासनाने फिल्म इन्स्टिट्यूटसाठी ही जागा मागितली, तेव्हा सदाशिवरावांनी मोठ्या मनाने आणि कवडीमोल दराने ही जागा सरकारला देऊनही टाकली. कारण त्यांच्या मते, या जागेवर काही तरी महत्त्वाचे कार्य उभे राहणार होते.

केळकर कुटुंबाचा हा रंजक इतिहास आपल्याला वाचायला मिळतो, 'सुगंधोपासना' या छोटेखानी पुस्तकात. अत्तरवाले अण्णासाहेब तथा विनायक गणेश वझे यांचा मोठा मुलगा गोविंदराव तथा भाऊसाहेब केळकर यांनी हे पुस्तक लिहिले आहे. ग्रंथाली प्रकाशनाने ते २००२ मध्ये प्रकाशित केले आहे. लेखकाच्या शब्दांत सांगायचे, तर आसमंतात दरवळणाऱ्या एका यशस्वी उद्योगाची ही चरित्रकथा आहे. म्हटले तर ही उद्योगकथा आहे आणि म्हटले तर कुटुंबकथाही आहे. विनायक वझे यांचे दत्तकविधान होण्याच्या एक वर्षे आधी, १९३२ मध्ये गोविंद केळकरांचा जन्म झाला. त्यामुळे त्यांचे आडनाव केळकरच राहिले. पण दत्तकविधानानंतर काही वर्षांनी जन्मलेल्या त्यांच्या सख्ख्या भावांची रमेश आणि सुरेश यांची आडनावे वझे झाली.

१९२२ मध्ये सुरू झालेला हा उद्योग १९५२ पासून गोविंदरावांनी सांभाळला आणि वाढवला. कारण ते स्वतः बुद्धिमान अत्तारी होते. अनेक सुगंधी द्रव्यांच्या संमिश्रणातून आपल्या गंध संवेदना चेतवणाऱ्या वेगळ्याच सगंधाची निर्मिती करण्याची दुर्मीळ कला त्यांनी अवगत केली. वेगवेगळी अत्तरे कशी केली जातात याचे फारच मनोवेधक वर्णन त्यांनी केले आहे. गाणे समजण्यासाठी जसा कान तयार व्हावा लागतो तसा गंध समजण्यासाठी नाक तयार व्हावे लागते. आकर्षक आणि अभिनव सुगंध तयार करण्यासाठी अनेक वर्षांची तपश्चर्या लागते. अनुभवी गुरूंचे मार्गदर्शन आवश्यक असते आणि त्याचबरोबर तरल संवेदनशीलता आणि चिकाटी हे दोन्ही गुण असावेच लागतात. आपल्या या आत्मनिवेदनात भाऊ साहेबांनी कुटुंबप्रणीत उद्योग कसे चालतात आणि यशस्वी होण्यासाठी कुटुंबातील प्रत्येक सदस्याला काय पथ्ये पाळावी लागतात, यावरही मार्मिक विवेचन केले आहे. उद्योग विस्ताराच्या प्रवासात त्यांना आलेले अनुभव वाचताना वाचकालाही व्यवसाय व्यवस्थापनाविषयी अनेक गोष्टी समजतात. उत्पादनाची गुणवत्ता टिकवणे, हेच या व्यवसायात सर्वात महत्त्वाचे आणि अवघड काम असते. त्याविषयीचे केळकरांचे अनुभवाचे बोल वाचणे रंजकही आहे आणि उद्बोधकही !

शैक्षणिक दर्जाच्या बळावर मानाचे स्थान मिळविलेल्या वझे-केळकर कॉलेजामध्ये दोन वर्षांपूर्वीपासूनच परफ्युमरी आणि कॉस्मेटिक्सचा आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त अभ्यासक्रम सुसज्ज प्रयोगशाळेसह सुरू झाला आहे. त्यातून भाऊसाहेबांनी रोवलेली महाराष्ट्राची सुगंधी पताका अनेक विद्यार्थी जगभर फडकवत राहतील. केळकर यांनी सामाजिक उत्तरदायित्वालाही महत्त्व देत सिंधुदुर्गातील देवगड येथे कॉलेज स्थापन केले.

**( लेखक मुख्यमंत्र्यांचे माजी माहिती अधिकारी आहेत. )**

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# जिओ कंपनीसोबत कोनाकोणाचे लागेबांधे

## आक्रमक | प्रकाश वडमारेंची सिओंकडे तक्रार

पुण्यभूमी प्रतिनिधी





बीड: शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते बार्शी नाका या दरम्यान जिओ कंपनीकडून ऑप्टिकल फायबर केबल टाकण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर भागातले नुकसान होत आहे. तसेच शहरातील सीसी रोड, पाणी पुरवठा करणाऱ्या पाईपलाईनचेही नुकसान होत आहे. त्यामुळे सदरील काम तातडीने थांबविण्यात यावे.अशी तक्रार प्रकाश वडमारे यांनी, नगर परिषद मुख्याधिकारी यांना दिली आहे.

बीड नगर परिषद प्रशासनास दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिओ कंपनीकडून ऑप्टिकल फायबर केबल टाकले जात आहे. मात्र बीड नगर परिषदकडून डिमांड नोट जमा करुन जर रीतसर परवानगी घेतली असेल तर त्याची प्रत आम्हास देण्यात यावी, आणि जर विनापरवानगी कंपनी काम करत असेल तर हे काम तात्काळ थांबवण्यात यावे. असे तक्रार अर्जात प्रकाश वडमारे यांनी नमूद केले आहे.जिओ कंपनीकडून ऑप्टिक फायबर केबल टाकत असतांना झालेले नुकसान कंपनीकडून वसूल करण्यात यावे. अन्यथा आपल्या विरोधात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल.असा इशाराही देण्यात आला आहे. जिओ कंपनीच्या कामामध्ये नेमके कोनाकोणाचे लागेबांधे आहेत. असा सवालही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे. कारण शहरातील रस्त्याची आणि पाणीपुरवठा पाईपलाईनची जिओ कंपनीकडून नासधूस होत असतानाही नगर परिषद प्रशासन गप्प कशामुळे आहे. जिओ कंपनी आणि गुत्तेदार यांच्यासोबत लागेबांधे असल्यामुळेच सदरील काम राजरोसपणे सुरू आहे.त्यामुळे शहराचे मोठे नुकसान होत आहे, ही बाब गंभीर असून सदरील काम तातडीने थांबविण्यात यावे. असा इशारा प्रकाश वडमारे यांनी निवेदनात दिला आहे.

### यापूर्वीही जिओ विरोधात गुन्हा

बीड शहरातील एका भागात जिओ कंपनीकडून ऑप्टिकल फायबर केबल टाकण्याचे विनापरवाना काम सुरु होते. मात्र जागरुक कार्यकर्त्यांमुळे सदरील काम थांबविण्यात आले होते तसेच कंपनी विरोधात कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर कंपनी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. परंतु जिओ कंपनी पून्हा विनापरवाना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते बार्शी नाका रोड इथपर्यंत ऑप्टिकल फायबर केबल टाकण्याचे काम करत आहे ही बाब गंभीर आहे.असा सवाल प्रकाश वडमारे यांनी उपस्थित केला.

# ...तर पाच लाख रुपये बक्षीस देणार

अॅड.श्री.सर्जेराव तांदळे: वंजारवाडी येथे केला संकल्प



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:तालुक्यातील आदर्शगाव वंजारवाडी येथिल छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये आज महाराष्ट्र दिनानिमित्त अध्यक्षिय भाषणावेळी बोलत असताना मा.ड.श्री. सर्जेराव तात्या तांदळे म्हणाले की, मुलांनी बिरुदेव डोने यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवुण उज्वल भविष्य घडवावे. प्रचंड इच्छाशक्ती असेल तर यश निश्चित मिळते. आदर्श गाव म्हणुन वंजारवाडी जिल्हा स्तरावर आदर्श ठरली आहे. आता शैक्षणिक क्षेत्रातही आपल्याला गगणभरारी घ्यायची आहे. तुम्ही शिक्षणाचे ध्येय ठेवा मी सक्षमपणे तुम्हच्या पाठिशी उभा आहे. वंजारवाडी गावातील शाळेत शिक्षण घेवुन जो कोणी आयएएस-आयपीएस अधिकारी होईल त्यांना मी पाच लाख रुपये बक्षीस देणार असे वचन तात्यासाहेब यांणी दिले. यावेळी तात्यांनी महाराष्ट्र राज्याची निर्मिती, व कामगार दिनाची माहिती सविस्तरपणे विद्यार्थ्यांना सांगितली.

सर्वप्रथम यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पुजन करुन ग्रामपंचायत कार्यालय, जि.प.प्रा.शाळा व मातोश्री विद्यालयामध्ये पान २ वर

# पेरणीपूर्वी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवा!

पंकजा मुंडे:खरीप हंगामात ६ लाख २९ हजार हेक्टरवर पेरणी



पुण्यभूमी प्रतिनिधी

जालना: खरीप हंगामातील पेरण्या सुरु होण्यापूर्वी शेतकऱ्यांना बियाणे, रासायनिक खते व पीक कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी आतापासूनच योग्य नियोजन करण्याचे निर्देश राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले.जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात खरीप हंगामपूर्व तयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्रीमती मुंडे या बोलत होत्या. यावेळी खासदार कल्याण काळे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार बबनराव लोणीकर, आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण, आमदार राजेश राठोड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, प्रभारी जिल्हा पोलीस अधीक्षक आयुषकुमार नोपाणी, अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मैत्रवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, विभागीय कृषी सहसंचालक पी.आर. देशमुख, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी जी. आर. कापसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, कृषी विभागाने यावर्षी खरीप हंगामातील पेरणीचे प्रस्तावित क्षेत्राच्या प्रमाणात बियाणे रासायनिक खते शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. तसेच पावसाअभावी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येवू नये. पुरेसा पाऊस झाल्यावरच शेतकऱ्यांनी पेरणी करावी. यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यामध्ये व्यापक जनजागृती करावी. तसेच पीक पेरणीची योग्य पद्धत, बियाणांची निवड आणि पेरणीपूर्व प्रक्रिया, पेरणीचा योग्य कालावधी आदीबाबतीची माहिती शेतकऱ्यांना द्यावी. शेतकऱ्यांपर्यंत अत्याधुनिक तंत्र पोहोचविण्यासाठी क्षेत्रिय कर्मचारी आणि शेतकऱ्यांनी समन्वय ठेवावा. शेतक-यांना विविध पिकांच्या पेरणीची योग्य वेळ आणि पद्धत, त्या पिकांवर येणारे रोग आणि त्याअनुषंगाने करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी सविस्तर माहिती देण्यासाठी कृषी विभागाने विशेष मोहीम राबवावी. जमिनीची उत्पादकता वाढवून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळेल यासाठी प्रयत्न करावा. जिल्ह्यात बोगस बियाणे आणि रासायनीक खतांची विक्री होवू नये, यासाठी पथके स्थापन करुन, दोषींवर कायदेशीर कारवाई करावी. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त होताच पंचनामे करुन बियाणे नमुने तपासण्यापेक्षा बियाणे पुरवठादारांकडील साठे तपासून त्याचवेळी त्याची गुणवत्ता तपासावी. तसेच जादा दराने खत विक्री करणे, खतांचा साठा करून ठेवणे, असे अवैध काम करणाऱ्या विक्रेत्यांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी व त्यांच्या तक्रारींच्या निराकरणासाठी योग्य उपाययोजना कराव्यात. तसेच खरिप हंगामाकरीता शेतकऱ्यांना बँकेच्या माध्यमातून होणारे कर्ज वितरणाचे उद्दिष्ट हे जून पर्यंत पूर्ण करावे. शेतकऱ्यांना बँकेत चकरा माराव्या लावू नये याची दक्षता घ्यावी. तसेच पात्र लाभार्थ्यांना पंतप्रधान कुसुम योजना आणि मागेल त्याला सौर कृषी पंप योजनाचा लाभ वेळेत मिळावा यासाठी नियोजन करावे. पान २ वर

# कामगारांना योजनांचा लाभ मिळवून देणार

नियोजन:जिल्ह्यात व्यापक मोहिमेचा प्रारंभ

पुण्यभूमी प्रतिनिधी



तलवाडा:एक्शन एड असोसिएशन आणि आझाद क्रांती कामगार युनियन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सन्मानित कामगार, सुरक्षित भविष्य मोहिमेचा प्रारंभ दि.०१ मे २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय श्रमिक दिनाच्या म्हणजेच महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने गेवराई तालुक्यातील राजापूर या गावातून करण्यात आला. हजारो कामगारांना सरकारी कल्याणकारी योजनांमध्ये समाविष्ट करण्यासाठी एक विशाल मोहिम सुरू करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे नेतृत्व एक्शनएड असोसिएशन आणि आझाद क्रांती कामगार युनियन हि संघटना करत आहे. हि मोहिम एक्शनएडच्या राष्ट्रीय पातळीवरील उपक्रमाअंतर्गत सन्मानित कामगार, सुरक्षित भविष्य सरकारी योजनांमध्ये समाविष्ट करण्यासाठी मोहिम या कार्यक्रमाचा भाग आहे. ज्याचे उद्दिष्ट एका वर्षात देशातील १०० जिल्ह्यात १० लाख कामगारांना सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये समाविष्ट करणे असा आहे.

एक्शनएडचे सहायक संचालक तनवीर काझी यांनी सांगितले आहे की, या मोहिमेद्वारे आम्ही देशभर १०,००० 'श्रमिक साथी' तयार करीत आहोत. जे १० लाख कामगारांना माहिती, नोंदणी आणि सरकारी योजनांपर्यंत पोहोचण्यात मदत करतील. प्रत्येक जिल्ह्यात १०० श्रमिक साथी कार्यरत असतील. याबरोबरच जिल्हा प्रशासन, ग्रामपंचायत आणि स्थानिक समुदायाच्या सहकार्यातून या मोहिमेला पुढे नेले जाईल. या मोहिमेस प्रारंभ करताना आझाद क्रांती कामगार युनियन संघटनेच्या अंतर्गत बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी, ग्रामीण भागामध्ये नोंदणी सहाय्य शिबीरे आयोजित केली जातील. जनजागृती कार्यक्रम तयार केले जातील आणि स्थानिक रेडिओ, डिजिटल माध्यमे आणि माहिती साहित्याद्वारे (खएउ) कामगारांना जागरूक केले जाईल. याशिवाय, पंचायत स्तरावर जिल्हाधिकार्यांसोबत व संबंधित विभागांसोबत समन्वय बैठका आयोजित करून योजनांच्या चांगल्या कार्यान्वयनाच्या दिशेने काम केले जाईल. या मोहिमेचा उद्देश विशेषतः असंघटित पान २ वर

# पैसे घेतल्याशिवाय फाईल सरकेना!

बोंबला: केज तालुक्यात सर्रास प्रकार



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: तालुक्यात नव्हे तर महाराष्ट्रात घरकुल योजने पासुन कोणी वंचीत राहु नये म्हणून सर्वेषण करण्याची ग्रामविकास घोषणा शासनाने केली आहे परंतु ग्रामपंचायत कार्यालयांचे अधिकारी, कर्मचारी केज तालुक्यात १००० एक हजार रुपयांची मागणी करत आहेत असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू आहे तरी अशा लाचलूचपत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व अशा अधिकाऱ्यांना निलंबित पान २ वर

# युवक आघाडी सुवर्ण महोत्सव

धोरण:कळंबमध्ये राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:शहरातील सामाजिक, संस्कृतीक ,क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्याद्वारे युवक आघाडी या संघटनेने आपली वेगळी वेगळी ओळख निर्माण केली आहे नि:पक्ष, निर्भीड ,सत्य हे ब्रीद घेऊन १९७५ साली स्थापना झाली व कळंब शहरात प्रथम शिवजयंती महोत्सवाची सुरुवात झाली यास २५ वर्ष पूर्ण होत आहे वयानिमित्त भव्य कबड्डी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे संघटनेचे अध्यक्ष यशवंत दशरथ यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनात संघटनेचे कार्य गेली २५ वर्ष सुरू आहे हे वर्ष संघटनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून या निमित्त कळंब युवक आघाडी शिवजयंती उत्सव समिती कळंब,जिल्हा धाराशिव २०२५ व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व धाराशिव जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने राज्यस्तरीय खुला गट पुरुषांची निमंत्रित कबड्डी स्पर्धा दिनांक १०, ११ व १२ मे २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल बार्शी रोड, कळंब येथे आयोजित करण्यात आली आहे या स्पर्धे साठी पहिले बक्षीस ५१ हजार रुपये कै. सुरेश हारकर यांच्या स्मरणार्थ फिरता चषक, मा. उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाराष्ट्र राज्य यांच्या ६१ निमित्त मा. अजित (दादा) पिंगळे यांच्या सौजन्याने रोख दुसरे बक्षीस ३१ हजार रुपये कै. तुकाराम ( दादा ) कदम यांच्या प्रित्यर्थ चषक ,मा.डॉ. संदीप तांबारे व सुरेश आळणे यांच्या सौजन्याने २१ हजार रुपये व १० हजार रुपये रोख बक्षीस तिसरे बक्षीस कै. दिलीप जावळे यांच्या प्रित्यर्थ चषक, शशिकांत निरपळ यांच्या सौजन्याने २१००० रुपये रोख बक्षीस याचबरोबर उत्कृष्ट पकड २५०१ हरिश्चंद्र चोंदे यांच्या स्मरणार्थ व उत्कृष्ट चढाई २५०१ विलास थोरात यांच्या स्मरणार्थ, अष्टपैलू ५००१ संपतराव गायकवाड यांच्या स्मरणार्थ दिवसाचा सामनावीर २५०१ कै. बशीर ( दौला ) मणियार यांच्या स्मरणार्थ रोख बक्षीस वरील सर्व वैयक्तिक बक्षीस माननीय पांडुरंग कुंभार यांच्या पान २ वर

# महाबली कॉटन इंडस्ट्रीजला आग

दाहकता:तीस लाखांचे झाले नुकसान



पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई: शहराजवळ असलेल्या महाबली कॉटन इंडस्ट्रीजला आज दि. ३ मे शनिवार रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास प्रेसिंग मध्ये काम चालू असताना अति उष्णतेमुळे आगीची ठिणगी पडून आग लागली असल्याचा अंदाज व्यक्त केला जात असून या आगीमध्ये प्रेसिंग मध्ये चालू असलेला कापूस, रुई जळून तीस लाखांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. उशिरा का होईना कृषी उत्पन्न बाजार व नगरपरिषद गेवराई अग्निशमन गाडी पोहोचल्याने आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन दलाला यश आले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, श्री महाबली कॉटन इंडस्ट्रीज गेल्या तेरा वर्षापासून कार्यरत असून कापूस व्यापारामध्ये श्री महाबली कॉटन इंडस्ट्रीजचे मोठे नाव आहे. गेवराई तालुक्यातील कापूस व्यापारामध्ये महाबली इंडस्ट्रीज चा मोठा हातभार आहे. शेतकऱ्यांना वेळोवेळी इंडस्ट्रीजच्या माध्यमातून मदत करण्यात येते. गेल्या तेरा वर्षांमध्ये एकदाही आग लागण्याचा असा अनुचित प्रकार घडलेला नाही. परंतु दिनांक ३ मे रोजी अति उष्णतेमुळे आगीची ठिणगी पडून आग लागली असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असून या आगीमध्ये प्रेसिंग मध्ये चालू असलेला पान २ वर

## समस्या | बारदाणा, वाहतूक भांडं,पिशव्या भरायलाही परवडेना

# माल निघालाय पण भाव ढासळले

पुण्यभूमी प्रतिनिधी




लिंबागणेश:गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांचा कांदा उत्पादनाकडे कल वाढला आहे .त्यामुळे खरीप, रब्बी हंगामात कांद्याकडे शेतकऱ्यांचा ओढा वाढला असुन दोनही ऋतुत कांदा लागवड करत आहेत.कांदा उत्पादनात वाढ झाली परंतु कांद्याला सद्यपरिस्थितीत भाव नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. भर उन्हाळ्यात कांदा काटणीला मजुर मिळत नाहीत.त्यातच उन्हाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्यावर असताना शेतकरी कांदा काढणी करत आहेत. कांद्याला फेब्रुवारी मध्ये प्रति किलो २०-३० रूपये बाजारभाव होता. तो टिकुन राहिल असे वाटत असतानाच बाजारभाव कमी होऊन ११ रुपये किलोवर आला आहे. कांदा उत्पादक शेतकरी ढासळलेल्या भावामुळे चिंतेत असुन भाडे वाहतुक,बारदाणा, पिशव्या भरायला सुद्धा परवडेना अशी खंत बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतकरी जालिंदर सुर्यभान ढास यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलुन दाखवली. बीड तालुक्यातील कांदा उत्पादक गाव म्हणून ओळख असलेल्या मुळुकवाडी पान २ वर

कांद्याचे भाव वाढल्यानंतर शासनाकडून दर रोखण्यासाठी प्रयत्न केले जातात.केंद्रीय पथक येतात,पाहणी करतात, निर्यातबंदी सारखी पावले उचलतात,आयात केली जाते. मात्र कांद्याचे भाव कोसळल्यानंतर मात्र शासन शेतकऱ्यांकडे ढुंकूनही पहात नाही. त्यामुळे भाव वाढल्यानंतर सरकारने लक्ष देऊ नये अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी दिली आहे.

# दारु अड्ड्यावर दोन ठिकाणी छापा

दणका:तलवाडा पोलिसांची कारवाई



पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील अंबिका नगर येथे रसायन हातभट्टीची व दारु विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळताच दिं.२/५/२०२५ रोजी . शुक्रवारी सकाळी तलवाडा येथील अंबिका नगर रसायन हातभट्टी व दारू अड्ड्यावर छापा टाकून कारवाई करण्यात आली आहे. हि कारवाई सपोनि सोमनाथ नरके, उपनिरीक्षक स्वापनिल कोळी, उपनिरीक्षक बोडके,गोपनीय पान २ वर